# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद.

## दिनांक ७.१०.२००५ (१६.९.२००५ रोजी ची तहकूब सभा)रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.

शुक्रवार दिनांक ७.१०.२००५ रोजी मा.महापौर श्री. किशनचंद लेखराज तणवाणी यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील ''प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह ''येथे दुपारी ३.०० वाजता ''वंदेमातरम '' या गिताने सुरू झाली सभेला मा.आयुक्त यांचेसह संबधीत अधिकारी व खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

०१. स.स.श्री.भगवान घडमोडे
०२. स.स.श्री.काशिनाथ कोकाटे
०३. स.स.श्री.संजय शिरसाट
०४. स.स.श्री.तरविंदरसिंग धिल्लन
०५. स.स.श्री.बम्हणे पुनमचंद सोनाजी
०६. स.स.श्री.सुरे सिताराम इसराम
०७. स.स.श्री.ताठे भाऊसाहेब पुंडलिक
०८. स.स.श्री.गवळी रविकांत काशिनाथ
०९. स.स.श्री.नाहदी नासेर महमंद याहीया
१०. स.स.श्री.पांडे विनायक प्रभाकर
११. स.स.श्री.दाभाडे मिलींद यशवंत
१२. स.स.श्री.ठाकुर पुरूषोत्तम रघुविरसिंग
१३. स.स.श्री.खान सलिम खान यासीन
१४. स.स.श्रीमती पाटील अलका रमेश
१५. स.स.श्री.जगताप संजय उत्तमराव
१६. स.स.सौ.मसरद बेगम शरफोद्दीन
१७. स.स.श्री.गायकवाड दिलीप नारायण
१८. स.स.श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल
१९. स.स.सौ.जोशी रजनी रमेश
२०. स.स.श्री.माळवतकर महेश शिवाजीराव
२१. स.स.श्री.अत्तरदे प्रकाश सुका
२२. स.स.श्री.जैस्वाल अनिल जुगलाल
२३. स.स.श्री.सोनवणे कचरू श्रीपती
२४. स.स.सौ.इंगळे शंकुतला सांडुजी
२५. स.स.सौ.रगडे सुशिला भगवान
२६. स.स.श्रीमती शिंदे मिराबाई रामराव
२७. स.स.सौ.खान अजरा जबीन मसुद
२८. स.स.सौ.खान मेहेरून्नीसा खान हमीद
२९. स.स.श्री.मो.जावेद मो.इसाक
३०. स.स.सौ.मिटकर शोभा हरीश्चंद्र
३१. स.स.सौ.यास्मीन बेगम अ.कदीर
३२. स.स.श्री.स.खुसरो बुऱ्हानोद्यीन
३३. स.स.श्री.अ.रशिद खान मामु
३४. स.स.श्री.पाटील नरवडे वसंत पांडुरंग
३५. स.स.श्री.रिडलॉन संजु सुग्रीव

३६. स.स.सौ.सिध्द वीणा गजेंद्र
३७. स.स.सौ.कुरैशी नजमा बेगम युनूस
३८. स.स.श्री.खान मुजीब मीर आलम खान
३९. स.स.श्री.खान निसार मोहमंद खान
४०. स.स.श्री.शेख मुनाफ शेख यासीन
४१. स.स.श्री.हाजी शेरखान अ.रहेमान
४२. स.स.सौ.राऊत छाया विलास
४३. स.स.श्री.पाथ्रीकर दत्ताभाऊ अण्णासाहेब
४४. स.स.श्री.बैनाडे कंवरसिंग किसनसिंग
४५. स.स.श्री.देसरडा प्रशांत सुभाष
४६. स.स.श्री.गायकवाड कैलास लक्ष्मण
४७. स.स.श्री.अमोदी अबुबकर बीन सईद
४८. स.स.सौ.शेख शमशाद बेगम शेख हफीज
४९. स.स.श्री.जेजुरकर संतोष सुधाकरराव
५०. स.स.श्री.तुपे त्र्यबंक गणपतराव
५१. स.स.सौ.पोळ सरला सखाराम
५२. स.स.श्री.कटकटे सतीष विश्वनाथ
५३. स.स.सौ.खान जहुरबी नासेर
५४. स.स.सौ.बोरामणीकर कला सुरेश
५५. स.स.सौ.मंगला प्रकाश गायकवाड
५६. स.स.श्री.वैद्य रेणुकादास दत्तोपंत
५७. स.स.श्री.सावंत मधुकर दामोधर
५८. स.स.सौ.महाजन मनिषा अमर
५९. स.स.श्री.गांगे रविंद्र लक्ष्मण
६०. स.स.श्रीमती डॉ.बिनवडे आशा उत्तम
६१. स.स.श्री.खुडे विजय किसन
६२. स.स.श्री.खेंडके संतोष सर्जेराव
६३. स.स.श्री.शिंदे दामोधर माधवराव
६४. स.स.श्री.गांगवे बन्सीलाल तुळशीराम
६५. स.स.सौ.ससाणे सरीता अशोक
६६. स.स.श्री.डांगे बाबासाहेब लक्ष्मण
६७. स.स.श्री.कुचे नारायण तिलोकचंद
६८. स.स.सौ.शिंदे पुष्पा बाळु
६९. स.स.श्री.विसपुते शंशाक दामोधर
७०. स.स.श्री.निमगांवकर प्रल्हाद गणपतराव
७१. स.स.सौ.कोंडेकर अंजली दिलीप
७२. स.स.श्री.जोशी संजय रामदास
७३. स.स.सौ.रहाटकर विजया किशोर
७४. स.स.श्री.दाभाडे हिम्मतराव साळुबा
७५. स.स.श्री.मोरे कचरू विश्वनाथ
७६. स.स.सौ.जैन अल्पा विकास
७७. स.स.श्री.बारवाल गजानन रामकिसन
७८. स.स.सौ.मोमीन सफीया फिरदोस
७९. स.स.श्री.जहागिरदार अजीज मुख्तार
८०. स.स.सौ.घोडेले अनिता नंदकुमार

**नामनिर्देशित पालिका सदस्य**

०१. स.स.श्री.संजय किसनराव केनेकर

०२. स.स.श्री.किशोर बाबुलाल तुलशीबागवाले

०३. स.स.श्री.सुरेंद्र कुलकर्णी

**चर्चा :**

श्री.मुजीब खान :मागिल सभेत चर्चेसाठी वेळ देण्यात आलेला नव्हता विषय पत्रिकेला सुरूवात करण्यात आलेली होती.आजच्या सभेत चर्चेसाठी वेळ देण्यात यावा.

मा.महापौर : तहकूब सभा आहे. विषय पत्रिका संपल्यानंतर विचार करण्यात येईल. विषय क्रं.३ वर चर्चा करावी.

**विषय क्र. ६२/३ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, महानगरपालिकेच्या अस्थापनेवरील वर्ग-४ संवर्गातील खालील दर्शविलेल्या प्रमाणे शिल्लक अनुशेष भरून काढण्यासाठी सेवा योजन कार्यालय व जाहिरात देवून दि.२७.०६.२००३ पर्यंत अर्ज मागविण्यात आले होते.

| अ.क्र. | पदाचे नांव | अनुशेषानुसार रिक्त पदाची संख्या | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | अनु.जमाती | विजा (अ) | भज (ब) | इमाव | एकूण |
| ०१. | इले.पंप चालक | - | ०१ | - | - | ०१ |
| ०२. | लाईनमन (पापु) | ०१ | ०१ | ०१ | - | ०३ |
| ०३. | लाईनमन (विद्युत) | ०१ | - | - | ०१ | ०२ |
| ०४. | सुरक्षा रक्षक | ०१ | ०१ | - | - | ०२ |
| ०५. | माळी | ०५ | - | - | - | ०५ |
| ०६. | शिपाई | - | ०५ | ०१ | - | ०६ |
| | **एकूण** | **०८** | **०८** | **०२** | **०१** | **१९** |

वरील पदासाठी प्राप्त झालेल्या पत्र अर्जानुसार व सेवा योजन कार्यालयाकडील प्राप्त यादीतील उमेदवारांना दि.२८.०९.०३ रोजी लेखी मुलाखतीस बोलाविण्यात आले होते. परंतू प्रकरण मा.उच्च न्यायालयात न्याय प्रविष्ट झाले व मा.उच्च न्यायालयात दिनांक २६.०९.२००३ रोजी सुनावणी होवून वर्ग-४ संवर्गातील अनुशेष भरून काढण्यासाठी प्राप्त झालेल्या सर्व पात्र उमेदवारांना लेखी परिक्षेस बोलवावे व त्यातील गुणवत्तेनुसार व सेवा भरती नियमानुसार नेमणूकीची कार्यवाही करावी, असे निर्देश दिले होते. त्यामुळे दिनांक २८.०९.२००३ रोजीच्या लेखी परिक्षा रद्द करण्यात आल्या होत्या. सन २००४ मध्ये लोकसभा व विधान सभेच्या सार्वत्रिक निवडणूकीची व २००५ मध्ये महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणूकीची आचार संहिता असल्यामूळे मुलाखती घेता आल्या नाहीत.

दिनांक ०६.०६.२००५ रोजी पात्र उमदवारांच्या लेखी परिक्षा घेण्यात आल्या व त्यानंतर दिनांक १२.०७.२००५ व १३.०७.२००५ रोजी तोंडी परिक्षा घेण्यात आल्या. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५४ (१) अन्वये गठीत केलेल्या निवड समितीने खालील दर्शविलेल्या गुणानुक्रमे पात्र उमेदवारांची निवड यादी मान्यतेस्तव सादर.

| अ. क्र. | निवड केलेल्या उमेदवाराचे नांव (सर्वश्री) | पद | प्रवर्ग | प्राप्त केलेले एकूण गुण | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| ०१. | कोलते रावसाहेब आनंदा | लाईनमन (पापु) | अनु.जमाती | ७६.७५ | |
| ०२. | अंबोरे मनोज मारोती | लाईनमन (विद्युत) | इमाव | ७६.५ | |
| ०३. | सोनवणे विष्णु बाबुराव | लाईनमन (विद्युत) | इमाव | ७०.२५ | प्रतिक्षा यादी |
| ०४. | पाडळे विजय सांडू | लाईनमन (विद्युत) | अनु.जमाती | ५७ | |
| ०५. | पल्हाळ किशोर भिमराज | लाईनमन (विद्युत) | अनु.जमाती | ५४.५ | प्रतिक्षा यादी |
| ०६. | चव्हाण बाळासाहेब बळीराम | सुरक्षा रक्षक | विजा-अ | ६१ | |
| ०७. | पवार विष्णु मल्लू | इले.पंपचालक | विजा-अ | ६५.५ | |
| ०८. | पवार वसंत जागाराम | इले.पंपचालक | विजा-अ | ५२ | प्रतिक्षा यादी |
| ०९. | जाधव नंदकिशोर सखाराम | माळी | अनु.जमाती | ७३.५ | |
| १०. | ठाकरे देविदास रामराव | माळी | अनु.जमाती | ६९.७५ | |
| ११. | चव्हाण प्रविण भाऊसाहेब | माळी | अनु.जमाती | ६४.५ | |
| १२. | मंजु करणसिंग चव्हाण | माळी | अनु.जमाती | ६३.८५ | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १३. | सुरले गणेश गोटूजी | माळी | अनु.जमाती | ६०.८५ | |
| १४. | गरूड भानुदास जगन्नाथ | माळी | अनु.जमाती | ६० | प्रतिक्षा यादी |
| १५. | बोरकर चांदुराव सखाराम | माळी | अनु.जमाती | ६० | प्रतिक्षा यादी |
| १६. | चव्हाण पुंडलिक खेरू | शिपाई | विजा-अ | ८०.५ | |
| १७. | जारवाल कपुरचंद फकिरचंद | शिपाई | विजा-अ | ८० | |
| १८. | जाधव राजु लिंगाजी | शिपाई | विजा-अ | ७७.२५ | |
| १९. | राठोड राजु सिताराम | शिपाई | विजा-अ | ७७.२५ | |
| २०. | राठोड संतोष मधुकर | शिपाई | विजा-अ | ७६.५ | |
| २१. | राठोड अशोक मन्साराम | शिपाई | विजा-अ | ७६ | प्रतिक्षा यादी |
| २२. | राठोड विजय मधुकर | शिपाई | विजा-अ | ७५.५ | प्रतिक्षा यादी |
| २३. | परदेशी संजय फुलचंद | शिपाई | भज (ब) | ८३.७५ | |
| २४. | आहेरकर नितीन विठ्ठल | शिपाई | भज (ब) | ७६.५ | प्रतिक्षा यादी |

करिता मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ (१) अन्वये वर नमूद केलेल्या व निवड झालेल्या उमेदवारांना त्यांच्या नांवा समोर दर्शविलेल्या पदावर नियुक्ती देण्यासाठीचा प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**<u>संवाद :</u>**

श्री.अब्दुल रशिद खॉन : कमेटीत कोण अधिकारी होते कोणत्या उमेदवारांस किती गुण मिळालेले आहे. ही संपूर्ण माहिती आवश्यक आहे.

मा.महापौर :या विषया संबधी प्रशासनाने सविस्तर खुलासा करावा.

श्री.कोकाटे काशिनाथ :विषय क्र ३ च्या संदर्भात प्रशासनाकडून माहिती घेणे आवश्यक आहे.नोकर भरती करीत असतांना वृत्तपत्रात जाहीरात देवून अर्ज मागविण्यात आले व संबधीतांच्या अर्जाची छाननी करून त्या उमेदवारांना लेखी व तोंडी परीक्षेस बोलविण्यात आले तोंडी परीक्षेसाठी २० मार्क ठेवण्यात आलेले होते हे सर्व कार्यवाही झाल्यानंतर अंतीम यांदी अस्थापना विभागा मार्फत सुचना फलकावर लावण्यात आलेली आहे. या भरतीसाठी सर्व प्रक्रीया पूर्ण केली परंतु मागिल ११२४ कर्मचाऱ्यांची भरती केली त्यावेळी कोणते निकष लावण्यात आलेले होते त्यांचा देखिल खुलासा होणे आवश्यक आहे.

श्री.धिल्लन तरवेंद्रसिंग : असे प्रस्ताव यापूर्वी सभागृहासमोर आलेले नव्हते याचा अर्थ चूका झालेल्या आहेत. या सभागृहासमोर हा प्रस्ताव आणण्याची आवश्यकता का भासली याचाही खुलासा करण्यात यावा.

मा.महापौर : मा.विरोधी पक्ष नेता यांनी जी सुचना केली त्यांचाही खुलासा करण्यात यावा.तसेच ११२४ कर्मचारी भरती संदर्भात प्रश्न उपस्थित केलेला आहे त्यावर आता चर्चा करावी.

श्री.मुजीब खान : विषय क्र. ३ वर चर्चा होण्यापूर्वी या अगोदर ११२४ कर्मचाऱ्याची भरती करण्यात आली. जे अस्थायी कर्मचारी होते त्यांनाच कामावर घ्यावे असे न्यायालयाचे तसेच शासनाचे सुध्दा आदेश होते. व भरती होत असतांना मा.आयुक्त यांचेवर जबाबदारी टाकलेली होती. परंतू माझ्या माहिती प्रमाणे मी दोन महिण्यापूर्वी मा.आयुक्त यांना पत्र दिलेले आहे की या भरतीमध्ये २०० ते २५० कर्मचारी हे महानगरपालिकेत कार्यरत नसतांना नवीन बाहेरील उमेदवार घेण्यात आलेले आहे. जे महानगरपालिकेत कार्यरत होते त्यांना वगळण्यात आलेले आहे.न्यायालयाने नावासहीत यादी दिलेली आहे त्यानुसार भरती झालेली नाही.कोणकोणते उमेदवार बाहेरील या भरतीमधे समावून घेतले त्या संदर्भात सविस्तर माहिती मा.आयुक्ताकडे मी दिलेली आहे. त्यांचाही खुलासा करण्यात यावा. आतापर्यंत काय कार्यवाही केलेली आहे.

मा.उपआयुक्त(प्र) :महानगरपालिकेच्या अस्थापनेवर जे वेगवेगळया सवंर्गात अस्थायी कर्मचारी म्हणून काम करीत होते. असे बरेचशे कर्मचारी हे सन ९३ , सन ९४ पासून दैनिक

वेतनावर होत.सदरील कर्मचारीयांनी वेळोवेळी विनंती केली की आम्हाला कामावर घ्यावे म्हणून.काही कर्मचारी कामगार न्यायालयात गेले तर काही उच्च न्यायालयात गेले. मा.उच्च न्यायालयाने जे कर्मचारी ज्या विभागामध्ये काम करीत आहे अशी संवर्ग निहाय यादी तयार करणयास सांगितले .मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार संवर्ग निहाय यादी मा.उच्च न्यायालयाकडे ही सादर केली . हे कर्मचारी दैनिक वेतनावर होते पदाची मंजूरी महानगरपालिकेत नव्हती.११२४ पदनिर्मितीच्या ठरावास या सभागृहाने मान्यता दिली व तो ठराव शासन मंजूरीसाठी पाठविण्यात आलेला होता.या पदांना शासनाची मंजूरी आल्यानंतर त्या त्या विभागनिहाय मा.उच्च न्यायालयाने कामगार न्यायालयाच्या प्रकरणात हे निदर्शनास आणून दिले होते की, ज्या वेळेस भरती करणार आहोत त्यावेळेला संवर्गनिहाय व जेष्ठतेनुसार नेमणूक करावी, जेष्ठतेच्या बाहेरील एक ही कर्मचारी घेता येणार नाही हे ही बंधन महानगरपाकिकेस दिलेले होते वरील वेगवेगळया आदेशाचे अवलोकन करता शासनाने ११२४ पदांना मंजूरी दिल्यानंतर महानगरपालिकेने निवड समिती चे गठण करून प्रत्येक विभाग निहाय संवर्गाचे जे कर्मचारी ज्या विभागात आहे .काही कर्मचारी वयाने जास्त होते.अशा कर्मचाऱ्यांना वयात शिथिलता दयावी तसेच शैक्षणिक अर्हतेमधे आर आर मधे जी बंधनेआहे त्याचा कमेटीने विचार करून एकही बाहेरील कर्मचारी न घेता जे दैनिक वेतनावर होते त्यांना घेतलेले आहे.

श्री.मुजीब खान : महानगरपालिकेच्या सेवेत नसलेल्या व्यतिरिक्त जे ११२४ मधे काहींचा समावेश करण्यात आला त्याची नावासहीत यादी मा.आयुक्ताकडे मी दिलेली आहे त्याची चौकशी केली जात नाही यात जेष्ठतेचा विचार केलेला नाही चुकीची माहिती देत आहे.

मा.महापौर :११२४ कर्मचाऱ्याची भरती केली ते सर्व कर्मचारी यांनी नावे न्यायालयाच्या यादीनुसार आहेत का हा ही खुलासा करावा .

श्री.मुजीब खान :११२४ च्या नोकर भरतीत ज्यांच्यावर अन्याय झालेला आहे बोगस भरती केलेले आहे त्या संदर्भात सवीस्तर माहिती प्रशासनाकडे दिलेली आहे. जे महानगरपालिकेच्या सेवेत कार्यरत होते त्यांना काहींना घेण्यात आलेले नाही.त्यांना आजही न्याय मिळालेला नाही नावानिशी यादी मी दिलेली आहे. त्याची चौकशी झालेली नाही .मा.आयुक्त दौऱ्यावर जाणार होते म्हणून मी गप्प बसलो चौकशी करतो म्हणून त्यांनी म्हटले होते. या चोकशी साठी सर्वच पदाधिकारी यांची एक कमेटी नियुक्त करून विभाग निहाय चौकशी करावी यात बाहेरील काही लोकांना समावेश केलेला आहे हे दिसून येईल. खुले आम या भरतीत भ्रष्टाचार झालेला आहे त्यावेळी २५-५० हजार रूपयाची मागणी होत होती यात महानगरपालिकेची संपूर्ण शहरात बदनामी होत होती. जे बाहेरील लोकांना घेण्यात आले त्यांना त्वरीत काढण्यात यावे जे काम करीत होते त्यांना घेण्यात यावे त्यांचेवरील अन्याय दूर करावा ही विनंती आहे.

श्री.अ.रशीद खान :११२४ कर्मचारी भरती केले . यात बाहेरील काहींचा समावेश करण्यात आलेला आहे तसेच मजूर म्हणून घेतले काहींना वॉचमन म्हणून काम दिले. आजही वार्डात साफसफाईसाठी मजूर कमी आहे. काही मजूर राजरोषपणे कार्यालयात शिपाई म्हणून काम करीत आहे. मजूर म्हणून नियुक्ती दिली त्यांचेकडून मजूर म्हणून काम करून घ्यावे. आजही शहरात संपूर्णपणे स्वच्छता होत नाही. यास जबाबदार कोण ?११२४ मजूर म्हणून घेतले त्याच्या नियुक्त्या कोठे दिलेल्या आहेत याची चौकशी झाली पाहिजे.

श्री.मुजीब खान :विरोधी पक्ष नेता यांनी जी सूचना मांडली त्याचाही खुलासा करावा. असे ठराव यापूर्वी यासभागृहाच्या मंजूरीसाठी सादर झालेले नव्हते. यापूर्वीची भरती ही गैरकायदेशीररित्या झालेली आहे का असा प्रश्न पडतो. हा प्रस्ताव सादर करण्याचे कारण काय संपूर्ण खूलासा करावा.

श्री. जोशी संजय :महानगरपालिकेच्या ८२ शाळा असून या शाळांवर २५० शिपाई म्हणून कर्मचारी काम करीत आहे. या संदर्भात मी पत्र दिलेले आहे उत्तर मला मिळालेले नाही याचाही खुलासा व्हावा.काही शाळेत शिक्षक संख्या कमी पण शिपाई जास्त आहेत.

श्री. दत्ताभाऊ पाथ्रीकर :जी कमेटी नियुक्त केली ती कायदयानूसार बंधनकारक आहे व कायदेशीर आहे का तसेच मा.न्यायालयात जे कर्मचारी गेले होते व कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्याची जेष्ठतेनुसारच यादी मा. न्यायालयात सादर केलेली होती का ? जर जे कोर्टात गेले त्यांचाच विचार केला असेल ते हे योग्य नाही.जेव्हा केंव्हा ही न्यायालयाचे आदेश होतात त्याप्रमाणे त्याची शैक्षणिक पात्रता व जेष्ठता बघूनच सेवेत घेणे आवश्यक असते.सदर भरतीच्या बाबतीत मी अभ्यास केला त्यात असे दिसून आले की, खुल्या संवर्गातील कर्मचारी त्या भरतीत नाही. ही महानगरपालिका खुल्या सवर्गातील उमेदवारासाठी नाही का असा प्रश्न पडतो. या सर्व बाबीचा विचार होणे आवश्यक आहे या सर्व प्रकरणासाठी चौकशी समिती नियुक्त करावी ज्यांचेवर अन्याय झाला असेल तो दूर करावा.

श्री.नारायण कुचे :११२४ च्या नोकर भरतीतमधे श्री.संजय रगडे हा जेष्ठता यादीत नाही तरी त्यांना घेण्यात आले तसेच कांतीलाल थोरात हे ९२ क्रमांकावर असून जेष्ठता यादीत नाही त्याचे प्रमोशन झाले. विजय वाघमारे हे ८७ क्रमांकावर असून त्यांचे प्रमोशन झालेले नाही जे १०० क्रमांकाच्यावर आहे त्यांचे प्रमोशन होते इतराचे का नाही जेष्ठता यादीत नाव नसतांना प्रमोशन दिले, ११२४ लोकांची भरती संदर्भात हा प्रश्न आहे सर्व खुलासा करण्यात यावा.

मा.महापौर :प्रशासनाने या संदर्भात सवीस्तर खुलासा करावा.

श्री.अ.रशिद खान :प्रस्तावात माळी म्हणून ज्यांचे नावासमोर नमूद केले त्यांचेकडे प्रमाणपत्र आहे का?माळी काम करतात म्हणून त्यांना ते पद दिले.आतापर्यंत असे प्रस्तावसर्वसाधारण सभेच्या मान्यतेसाठी आलेले नव्हते आताच का ठेवण्याची आवश्यकता पडली.

मा.उपआयुक्त(प्र) : महानगरपालिकेचे सन ९९ व सन २००० च्या ठराव नुसार दैनिक वेतनावर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्याच्या पद निर्मितीच्या बाबतीत सर्वसाधारण सभेने ठराव पारीत केलेला आहे. या पदास शासन मंजूरीसाठी पाठविण्यात आले होते व १० ऑॅटोबर २००३ रोजी शासनाने या पदनिर्मितीच्या ठराव मान्यता दिलेली होती त्यात विशिष्ट अटी शर्ती देवून नेमणूकीचे आदेश दिलेले आहे. व या पदास महानगरपालिकेची मंजूरी व शासनाची मंजूर असल्यामूळे या पदाच्या संदर्भात प्रस्ताव सभागृहासमोर आणलेला नाही. नेमणूक देत असतांना या कर्मचाऱ्याना एक वर्षाच्या परीविक्षाधिन कालावधीची अट टाकून नेमणूका दिलेल्या आहेत. की नेमणूकी बाबत काही वाद निर्माण झाल्यास किंवा आपले नाव बेकायदेशीर रित्या निदर्शनास आल्यास अशा नेमणूका रद्य करण्याची अट त्यात दिलेली होती.

श्री. रेणूकादास वैद्य :अट टाकण्यापेक्षा बाहेरील कर्मचारी त्यात येणार नाही याची खबरदारी प्रशासनाने घ्यावयास पाहिजे होती.

श्री.देसरडा प्रशांत :आताच उपआयुक्त यांनी खुलासा केला त्यात शेवटी अट टाकण्यात आलेली आहे असे म्हटले याचा अर्थ स.सदस्य श्री मुजीब खॉन यांनी जो मुद्दा उपस्थित केला तो बरोबर आहे. हे दाखवून दिले.

श्री.मुजीब खॉन :आताच खुलासा केला तशी अट टाकण्यात आली. परंतू जे कर्मचारी कार्यरत होत त्यांना समाविष्ट करून न घेता बाहेरील उमेदवारांना नोकर भरतीत का समावेश केला हा प्रश्न आहे. ज्यांचेवर अन्याय झाला त्यांना न्याय दयावा ही आमची मागणी आहे.याची चौकशी झाली पाहिजे.

श्री.अ.रशीद खान :शासनाच्या आदेशाचा सन्मान करतो परंतु भरती करतांना योग्य प्रकारे झालेली नाही.असे मत स.सदस्यांनी व्यक्त केलेले आहे. प्रशासन नोकर भरती बरोबर केल्याचे सांगतात.परंतु बोगस भरती केलेली आहे. आपणा सर्वांना माहितच आहे

ज्यांनी १८० दिवस काम केले त्यांना कामावरून आपण कमी करू शकत नाही. या कर्मचाऱ्यांना कामावर घेवून एक वर्ष झालेले आहे अट नमूद करून फायदा काय?

श्री.कोकाटे काशिनाथ :विषय क्र ३ च्या अनुसरून जो मुद्दा उपस्थित केलेला आहे त्यास प्रशासन बगल देण्याचा प्रयत्न करीत आहे व विषयांतर होत आहे. सन ९३,९४ पासून दैनिक वेतनावर कर्मचारी होते असे म्हटले त्यानंतर काही कर्मचारी कोर्टात गेले व मा.न्यायालयाने यादी मागविली. मा.न्यायालयाचा आपण आदर करतो यात शंका नाही. परंतु जे कर्मचारी दैनिक वेतनावर घेतले ते कुणाच्या परवानगीने घेतलेले होते सर्वसाधारण सभा किंवा स्थायी समितीच्या निर्णायाप्रमाणे घेतलेले होते का त्यावेळी सेवा भरती नियम होते, यादी सर्वसाधारण सभेसमोर आलेली होती का? ९९-२००० मधे सर्वसाधारण सभेच्या निर्णयाची अमलबाजवणी केली असे म्हटले परंतु सन ९३ व सन ९४ मधे जी भरती दैनिक वेतनावर केली ती नियमाने केलेली नाही. शासनाची तसेच सभागृहाची दिशाभूल करून जो कार्यभार प्रशासन करीत आहे त्यास कुठेतरी बंधन घातले पाहिजे. ११२४ लोकांची भरती करतांना कोणते निकष लावण्यात आलेले आहे, किती प्रमाणाकानुसार विविध जाती जमातीचे लोक घ्यायचे त्याची अमलबाजवणी त्यावेळेस केलेली आहे का? कोणत्याही प्रकारची दखल न घेता जर अधिकाऱ्याच्या मनमानी धोरणानुसार महानगरपालिका चालविली जात असेल तर ते शक्य नाही. या भरतीमधे नियमाची पूर्णपणे पायमल्ली केलेली आहे. नियमाचा अधार घेवून ढोबळ उत्तर अपेक्षित नाही. सन ९३-९४ ला जी दैनिक वेतनावर भरती केली ती कुणाच्या आदेशाप्रमाणे केली शासनाचे आदेश होते का शासनाची परवानगी घेतली होती का, शासनाकडे पत्र दिलेले होते का या सर्व बाबीची चौकशी होणे अपेक्षीत आहे यात मोठा भ्रष्टाचार झालेला आहे. या भरतीमूळे आता ते कर्मचारी कायम केले व या नोकर भरतीतील लोकामूळे प्रशासनाला काम करणे कठीण झालेले आहे. नोकर भरतीच अशी झाली की कुठल्याही परीस्थिती चांगले काम हे कर्मचारी करणारच नाही.प्रशासन मा. न्यायालयाचे निर्णयावर बोट ठेवते परंतु मा. न्यायालयाने अनेक प्रकरणात निर्णय दिलेले आहे त्याची अमलबजावणी झालेली नाही त्याचे काय? त्या संबधी वरीष्ट न्यायालयात दाद मागविण्यात आलेली आहे. या बाबीला वेळीच पायबंध केले नाही तर नागरीकांचे प्रश्न सुटणार नाही आजच गंभीर दखल घेण्याची वेळ आहे.

श्री.देसरडा प्रशांत :नोकर भरती संदर्भात स.सदस्यांनीआपआपले मत व्यक्त केले. ११२४ कर्मचारी भरती केले त्यात ज्यांचे कुणाचे काम करायचे असेल त्यांची प्रत्येक जेष्ठता यादी वेगळी होती असे माझे मत आहे. या संदर्भात प्रशासंनाच्या किती ही निदर्शनास आणून दिले तरी कार्यवाही होत नाही . ही भरती होत असतांना यात जे कर्मचारी भरती केले ते कुणाचे नातेवाईक आहे का या बाबतीत चौकशी होणे आवश्यक आहे. एक एक अधिकाऱ्याचे दोन ते तीन कर्मचारी हे नातेवाईक असतील असे वाटते. एक कर्मचारी त्यांचे नावाखाली बजाज कंपनीमधील एक कर्मचारी यांना कामावर घेण्यात आले जे काम करीत होते त्यांना घरी पाठविले. ज्यांना घेतले त्यांचे रेकॉर्ड सर्व बजाज कंपनीमधे आहे असे निदर्शनास आणून दिल्यानंतरही प्रशासनाने कार्यवाही केलेली नाही. जेंव्हा रेकॉर्ड दिले तेंव्हा दोन महिण्यानंतर जे कर्मचारी दैनिक वेतनावर कार्यरत होते त्यांना कामावर घेतले. इथपर्यत प्रशासन शोध घेत आहे. स.सदस्य श्री. नारायण कुचे यांनी ज्या कर्मचाऱ्याच्या बाबतीत मुद्दा उपस्थित केला त्यांची संचिका आताच या सभागृहात मागविली जावी सत्य परीस्थिती समोर येईल.

मा.महापौर :११२४ कर्मचारी भरती संदर्भात चौकशी करून किती दिवसात अहवाल मा.आयुक्त सादर करतील याचा खुलासा त्यांनी करावा.

मा.आयुक्त :११२४ कर्मचारी भरती ही एक वर्षापूर्वी झालेली आहे. स.सदस्य श्री.मुजीब खान यांनी जे बाहेरील लोकांचा त्या भरतीत समावेश केला त्यांची नावेसहीत यादी मला

दिलेली आहे. ती चौकशी साठी दिलेली आहे.या संदर्भात एक महिण्यात चौकशी करून सर्वसाधारण सभैसमोर अहवाल ठेवला जाईल.दुसरे असे की ज्यांचे पगार ४००/-रू पेक्षा जास्त आहे. अशा कर्मचाऱ्याची नियुक्ती करायची असेल तर त्या संदर्भात नियुक्ती देण्याचे अधिकार या सभागृहाला आहे. त्यामूळे हा विषय क्र ३ सभागृहासमोर सादर केलेला आहे. यापूर्वी अशी पध्दत येथे नव्हती.परंतु सर्वसाधारण सभेचे जे अधिकार आहे त्यावर गदा येणार नाही याची दक्षता घेतली जाईल. यासाठी आयुक्त यांनी नियुक्त केलेली निवड समिती असते त्यात आयुक्त किंवा त्यांनी नियुक्त केलेला एक अधिकारी असतो. अध्यक्ष असतील व इतर अधिकारी असतील या कमेटीने कोणती पध्दतीने उमेदवाराचे निवड करावयास पाहिजे ते सर्व ॲक्ट मधे आहे ही सर्व कार्यवाही करून निवड यादी प्रस्तावात नमूद केलेली आहे. त्यात असे ही आहे की निवड समितीने निवड केलेल्या उमेदवारांची नियुक्ती केली जाईल परंतू ती नियुक्ती दयायची कि नाही हे अधिकार सभागृहाचे आहे.तसेच विषय क्र४ हा लाड समितीनुसार अनुकंपावर ज्याचे जे वारस होते जरी यात कमेटीने निवड केलेली नसेल तरी नियुक्त्या देण्याचे अधिकार कायदयानुसार या सभागृहास असल्यामूळे तो प्रस्ताव ठेवला आहे.

श्रीकोकाटे काशिनाथ :माझा जो मूळ प्रश्न होता त्यांचा खुलासा झालेला नाही.

मा.आयुक्त :११२४ कर्मचारी भरती संदर्भात एक महिन्यात चौकशी करून अहवाल दिला जाईल.

श्री.कोकाटे काशिनाथ : उपआयुक्त श्री कांबळे साहेब यांचेकडे या विभागाचा अनेक वर्षापासून कार्यभार आहे त्यांना या संदर्भात संपूर्ण माहिती आहे. एक पद भरावयाचे असेल तर या सभागृहासमोर येते. तर ११२४ पदावर नोकर भरती केली त्या संबधीचे संपूर्ण रेकॉर्ड उपआयुक्त प्रशासन यांचेकडे असेल. आताच माहिती घ्यावी.

मा.आयुक्त :११२४ कर्मचारी भरती संदर्भात कुणी आदेश दिले शासनाचे आदेश काय होते कूणाला अधिकार होते सर्वसाधारण सभेत पदांना मंजूरी दिली कि नाही याची संपूर्ण चौकशी साठी एक महिना आवश्यक आहे. एक महिन्यात चौकशी करून अहवाल सादर करण्यात येईल.

श्री.अजीज जागीरदार :कायद्यात तरतूद आहे. नगरसेवकाचे नातेवाईक असेल तर नगरसेवक पद रद्य होवू शकते. एखादा ठेकेदार यांनी निवडणूक लढवून नगरसेवक पद मिळविले तर ते रद्य होवू शकते तसेच पोलिस कर्मचारी यांचे नातेवाईक भरती झाले तर त्यांची नोकरी रद्य होवू शकते. या भरतीत जर कुणाचे नातेवाईक आढळून आल्यास कार्यवाही होणार आहे का याचाही खुलासा करण्यात यावा.

श्री.केनेकर संजय : लेखी परिक्षा व तोंडी परिक्षेचे गूण किती आहेत.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रिकर :१९ पदाच्या नियुक्त्या देण्याबाबत प्रस्ताव या सभागृहात येतो तर ११२४ कर्मचारी भरती केले तो प्रस्ताव का येवू नये.या कर्मचाऱ्या संदर्भात विधी विभागा मार्फत मा. उच्च न्यायालयात काय माहिती देण्यात आलेली होती.प्रशासनाकडे प्रमोशन तसेच रिक्त पदे भरण्या बाबत किती संचिका प्रलंबित आहे त्या संदर्भात मा.आयुक्त यांनी एक महिण्यात या संदर्भातही चौकशी करून माहिती या सभागृहासमोर ठेवावी .प्रकरणे प्रलंबीत असेल तर का प्रलंबीत आहे याचाही संपूर्ण खुलासा अहवालात करण्यात यावा.

मा.महापौर :११२४ कर्मचारी नोकरी भरती संदर्भात आताच जी चर्चा झाली त्यानुसार मा.आयुक्त यांनी एक महिण्यात संपूर्ण चौकशी करून अहवाल सभागृहासमोर ठेवावा.आता विषय क्र ३ वर चर्चा करावी.

श्री.अ.रशिद खॉन :या प्रस्तावात माळी म्हणून नियुक्ती केलेली आहे त्याऐवजी मजूर म्हणून नियुक्ती करता येत नव्हती का. माळी म्हणून नियुक्ती केली तर त्यांचेकडे तसे प्रमाणपत्र आहे का. प्रशिक्षण घेतलेले आहे का?मजूरांना शिपायाचे काम देण्यात येते म्हणून

मजूर म्हणूनच नियुक्ती देवू शकत नाही का?सफाईसाठी मजूर कमी आहे. शिपाई म्हणून का नेमणूक दयायची..

श्री. संतोष खेंडके :विषय क्र,३,४ ला स्थगिती देण्यात यावी. कारण अनुकंपा भरती बाबत मी दिं.२३.६.२००५ रोजी पत्र दिलेले आहे त्यांचा खुलासा अदयाप मला मिळालेला नाही.

मा.महापौर : स.सदस्य श्री संतोष खेडके आपला प्रश्न हा विषय क्र. ४ च्या संबधीत आहे विषय क.३ चालू आहे.

उपआयुक्त (महसूल) :औरंगाबाद महानगरपालिकेच्या अस्थापनेवर विविध १९ पदे भरण्यासाठी प्रशासनाने दिनांक १३.६.२००३ रोजी वृत्तपत्रात जाहीरात देवून त्यात शिपाई लाईनमन , माळी, विदयूत लाईनमन पाणीपूरवठा या विविध पदासाठी अर्हता निश्चित करण्यात आल्या होत्या आणि त्या अर्हताधारक उमेदवाराची अर्जाची छाननी करून त्यामधे विविध शैक्षणिक पात्रता प्रमाणपत्र आहे की नाही हे सर्व तपासणी करूनच प्रशासनाने दि.०६.०६.२००५ रोजी अशा एकूण १०१४ उमेदवारांना लेखी परीक्षेसाठी बोलविण्यात आले होते व सर्व उत्तर पत्रिकेची तपासणी करूनच प्रशासनाने त्यापैकी २०७ उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलविले होते व दिनांक १२.७.२००५ व दिनांक १३.७.२००५ रोजी मुलाखती घेण्यात आल्या मुलाखतीसाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ५४ नुसार जी निवड समिती गठीत केली त्या समितीने या उमेदवाराच्या मुलाखती घेतल्या. मुलाखत घेत असतांना शैक्षणिक पात्रता त्यांचेकडे असलेले जास्तीचे शैक्षणिक पात्रता तसेच अनुभव व त्या उमेदवाराचे व्यक्तिमत्व या सर्व बाबीची पाहणी करून प्रशासनाने या उमेदवाराची शिफारस केलेली होती ही शिफारस करीत असतांना जे सदस्य कमेटीत होते त्यांना विविष्ट मार्क अलग करून दिलेले होते त्या सर्व गुणांची बेरीज करून त्याची सरासरी काढून व ते गूण लेखी परीक्षेत मिळवून त्याची यादी दिं १३.७.२००५ रोजी प्रसिध्द केली होती जे उमेदवार विशिष्ट सवंर्गातील आहे उदा अनुसूचित जमाती किंवा इतर मागासवर्गीय, जे अनुसूचित जमातीचे उमेदवार आहे त्यांनी त्यांचे वैधता प्रमाणपत्र देणे आवशक आहे. इतर उमेदवार यांना नियुक्ती दिल्यानंतर वैधता प्रमाणपत्र सादर करण्यास कालावधी दिला जातो. कलम ५४ नुसार समिती गठीत केलेली होती मा.आयुक्त किंवा त्यांनी प्राधिकृत केलेला एक अधिकारी. मुख्यलेखापरीक्षक तसेच आयुक्त यांनी प्राधिकृत केलेले विभागप्रमूख त्याच बरोबर अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती याचे ही एक सदस्य समितीवर होते लाईनमन व इतर टेक्नीकल पदासाठी ज्या मुलाखती घेण्यात आल्या होत्या त्यामधे उपआयुक्त महसूल व प्रशासन व मुख्यलेखापरीक्षक या तीन ही पदाचा पदभार माझ्याकडे असल्यामूळे मी स्वत , शहर अभियंता तसेच समाज कल्याण विभागाचे श्री राठोड हे मागासवर्गीय सेल म्हणून त्यांना पत्र देवून बोलविले होते यात उदयान अधिक्षक श्री भडके तसेच डी.पी. कुलकर्णी, तसेच आदिवासी प्रकल्प विभागाचे श्री देशमूख होते. या भरती प्रक्रिये मधे प्रशासनाने लेखी परीक्षेतील गुण शैक्षणिक पात्रता अनुभव या सर्व प्रकारची छाननी करून ही भरती प्रक्रिया अत्यंत पारदर्शक पणे करण्यात आलेली आहे.

श्री.अ.रशिद खान : जे माळी म्हणून नियुक्त केले त्यांचे कडे प्रमाणपत्र आहे का तसेच अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती चे जे उमेदवार असतील त्यांनी त्याचे जातीचे प्रमाणपत्र वैघ ठवून आणल्यानंतरच नियुक्ती दिली जाते. असा नियम आहे.

श्री. संजय जगताप :संपूर्ण चूकीची माहिती देत आहे मोठा भ्रष्टाचार या भरतीत झालेला आहे संपूर्ण माहिती घेण्यात यावी. हा प्रस्ताव स्थगित ठैवण्यात यावा माझ्याकडे संपूर्ण पूरावे आहेत.

श्री. जोशी संजय :विषय क्र ३ व ४ हे स्थगित ठेवावे स.सदस्य हे भ्रष्टाचार झाल्याचे पूरावे देण्यास तयार आहे. तोपर्यत स्थगित ठेवावे पूढील बैठकीत हे विषय घेण्यात यावे.

श्री.पाथ्रीकर दत्ताभाऊ :या शहरात जातीचे बोगस प्रमाणपत्र देणारे एक मोठी टोळी आहे. जातीचे प्रमाणपत्र वैध होवून येत नाही तो पर्यत यांना नियुक्त्या देण्यात येवू नये अशी सूचना आहे.

मा.आयुक्त : अनुसूचित जमातीचे जे उमेदवार आहे त्याचे प्रमाणपत्र वैध करून घेणार त्यानंतर नियुक्त्या देणार आहोत.

श्री.अ.रशिद खॉन : अनुसूचित जमातीमध्ये माळी समाजाचे उमेदवार नसतात यात माळी पदावर अनुसूचित जमातीचे उमेदवार दाखविण्यात आलेले आहे हे सत्य आहे का.

मा.महापौर :हा विषय स्थगित ठेवल्यास पून्हा तीन महिने घेता येणार नाही त्यासाठी येत्या १७ तारखेला सभा होईल त्या बैठकीत प्रशासनाने सविस्तर माहितीसह सादर करावा.

श्री. संजय सिरसाट :लेखी व तोडी परीक्षेत किती मार्क उमेदवारांना पडले हे सूध्दा सुधारीत विषयामधे नमूद करावे. कारण या भरती प्रक्रियेमधे अनेक आरोप प्रत्यारोप करण्यात आलेले आहे. माझ्या माहिती प्रमाणे काही अधिकारी ज्यांना कुणाला कॉल दिले त्याचे घरी जावून जर लेखी परीक्षेत ६० गुण असेल तर तोंडी परीक्षेत १८ गुण देवून गूण संखया वाढविली व ज्यांना लेखी मधे ७२ गुण मिळाले त्यांना तोंडीमधे कमी गूण देवून त्या उमेदवारांची गुण टक्केवारी कमी कशी करायची हे केलेले आहे हा सुध्दा प्रकार झालेला आहे कदाचित माझी शंका असू शकते. लेखी व तोंडी परीक्षेत कोणत्या उमेदवाराला किती गूण मिळाले ते विषयामधे नमूद करावे अशा सूचना कराव्यात.

मा.महापौर :येत्या १७ तारखेला सभा होईल त्या बैठकीत हा विषय पून्हा सादर करावा त्यात लेखी व तोंडी परीक्षेला कुणाला किती गुण मिळाले ते नमुद करावे. यावर प्रशासनास काही मत मांडावयाचे असेल तर खुलासा करावा.

उपआयुक्त (महसूल) : जे उमेदवार निवडलेले आहे त्यातील काही` उमेदवार हे पहिल्या दुसऱ्या व तिसऱ्या क्रमांकावर लेखी परीक्षेत होते. ५० टक्के उमेदवार हे पहिल्या क्रमांकावर असून काहींना जास्त मार्कस् देवून गूण वाढवायचे व ज्यांना जास्त गूण असलेले कमी करायचे हे करणे शक्यच नाही.तोडी परीक्षेत मार्कस् देण्याची सर्व सदस्यांना मुभा होती तोंडी परीक्षेचे सर्व गुण एकत्रित करून व त्यात लेखी परीक्षेचे गुण मिळवून हे मार्कस् देण्यात आलेले आहेत.

श्री. संजय सिरसाट : राजकीय पध्दतीने खुलासा होत आहे जेंव्हा परीक्षा चालू होती तेंव्हा काही कर्मचाऱ्याना प्रशासनाने कारणे दाखवा नोटीस दिलेल्या आहेत त्या का देण्यात आलेल्या होत्या त्यांचा खुलासा करावा.

उपआयुक्त (महसूल) : या संबधीचा खुलासा जूलै महिण्याच्या सभेत केलेला होता. ज्या कर्मचाऱ्याना काम दिले होते त्यांनी त्याचे कामात हलगर्जीपणा केल्यामूळे नोटीसा दिलेल्या होत्या विशिष्ट क्रमांकावरील उमेदवार गैर हजर असतांना दुसरा उमेदवार त्या क्रमांकावर बसविण्यात आलेला होता व जो उमेदवार त्या क्रमांकावर बसलेला होता त्यांनी त्याचा स्वत: परीक्षा क्र. टाकलेला होता.या नोकर भरतीत भ्रष्टाचार झालेला नाही हे खात्रीने सभागृहास सांगू इच्छितो.

मा.महापौर :येत्या १७ तारखेला हा प्रस्ताव पून्हा विषय पत्रिकेवर ठेवण्यात यावा त्यात लेखी व तोंडी परीक्षेत मिळालेले गूण नमूद करावे.

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्ताव लेखी व तोंडी परीक्षेत मिळालेल्या गुणासह पुढील सभेत ठेवण्यांस मान्यता देण्यांत आली.

**विषय क्र. ६३/४ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, महानगरपालिकेच्या सफाई मजूर संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या मान्यता उक्त कर्मचारी स्वेच्छा निवृत्ती/रूग्णता सेवानिवृत्ती / नियम वयोमानाने किंवा मृत्युनंतर लाड समितीच्या शिफारशीनुसार दि.३०.०६.९४ च्या शासन निर्णयान्वये व वेळोवेळी शासनाचे सुधारीत आदेशानुसार त्यांच्या पाल्यांना अनुकंपावर नियूक्ती देण्याची तरतूद आहे. उक्त शासन निर्णयानुसार प्राप्त झालेल्या अर्जाची अनुकंपावर नियूक्ती देण्यासाठी प्रकरणांची छाननी करून सोबतच्या यादीत नमूद केलेली प्रकरणे अनुकंपावर नियूक्ती देण्यासाठी पात्र आढळून आलेली आहे.

करीता सोबतच्या,यादीतील अनुकंपा तत्वावरील प्रकरणांतील निवड केलेल्या उमदेवारांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ (१) अन्वये सफाई मजूर या पदावर नियूक्ती सर्वसाधारण सभेच्या कार्योत्तर मान्यतेस्तव देण्यासाठी प्रस्ताव विचारार्थ सादर.

**अनुकंपावर नियूक्तीसाठी प्राप्त झालेल्या अर्जाची ज्येष्ठता यादी.**

| अ. क्र. | सेवानिवृत्त (मयत) कर्मचाऱ्यांचे नांव | सेवानिवृत्ती/ मयत दिनांक | पदनाम | अर्जदाराचे नांव | अर्जाचा दिनांक | नाते | कार्यवाही |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१. | विठ्ठल नाथाजी बोर्डे | २०.१०.०४/मृत्यु | मजुर | प्रदीप विठ्ठल बोर्डे | २०.१२.०४ | मुलगा | **प्रकरण निकाली काढण्यात आले** |
| ०२. | साहेबराव साळूंके | १०.१२.०३/मृत्यु | फिटर | राधाबाई साहेबराव साळूंके | २४.१२.०४ | पत्नी | **प्रकरण निकाली काढण्यात आले** |
| ०३. | बबन कोंडीराम उमाप | २४.०९.०४/मृत्यु | मजुर | सरस्वतीबाई बबन उमाप | १५.०१.०५ | पत्नी | **प्रकरण निकाली काढण्यात आले** |
| ०४. | राजय्या नरसय्या पिपरी | २४.०१.०३/मृत्यु | वॉचमन | बालकुमार राजय्या पिपरी | ०५.०६.०३ | मुलगा | **प्रकरण निकाली काढण्यात आले** |
| ०५. | शांताबाई सांडु उमाप | ३१.०१.०५/स्वे.नि. | मजुर | भास्कर सांडु उमाप | १५.०१.०५ | मुलगा | **प्रकरण निकाली काढण्यात आले** |
| ०६. | राधाबाई कडुबा दाभाडे | ३१.०१.०५/स्वे.नि. | मजुर | रमेश कडुबा दाभाडे | ०१.०२.०५ | मुलगा | **प्रकरण निकाली काढण्यात आले** |
| ०७. | सरसाबाई त्रिभूवन | ३१.१.०५/स्वे.से.नि | मजुर | राजु तुकाराम त्रिभुवन | ०१.०२.०५ | मुलगा | **प्रकरण निकाली काढण्यात आले** |
| ०८. | पांडुरंग रगडे | ३१.१.०५/स्वे.से.नि | मजुर | सुनिल पांडुरंग रगडे | ०१.०२.०५ | मुलगा | **प्रकरण निकाली काढण्यात आले** |
| ०९. | धनाजी दाभाडे | २८.२.०५/स्वे.से.नि | मजुर | कचरू धनाजी दाभाडे | २५.०४.०५ | मुलगा | **प्रकरण निकाली काढण्यात आले** |
| १०. | दिलीपीबाई कागडा | १०.२.०५/स्वे.से.नि | स्विपर | विजय कागडा | २५.०४.०५ | मुलगा | **प्रकरण निकाली काढण्यात आले** |
| ११. | किसन वाघमारे | २८.२.०५/स्वे.से.नि | मजुर | अशोक किसन वाघमारे | ०९.०३.०५ | मुलगा | **प्रकरण निकाली काढण्यात आले** |
| १२. | सुभाष जनार्धन नरवडे | २८.२.०५/स्वे.से.नि | सफाई मजुर | शोभा सुभाष नरवडे | ०१.०६.०५ | पत्नी | **प्रकरण निकाली काढण्यात आले** |
| १३. | सरसाबाई हरी थोरात | ३१.३.०५/स्वे.से.नि | मजुर | अजय हरीभाऊ थोरात | ०५.०५.०५ | मुलगा | **प्रकरण निकाली काढण्यात आले** |
| १४. | विष्णु संपत हिवराळे | ३१.१.०५/स्वे.से.नि | मजुर | पार्वताबाई विष्णु हिवराळे | ०५.०५.०५ | पत्नी | **प्रकरण निकाली काढण्यात आले** |
| १५. | अ.गफुर अ.करीम | १७.०८.०४/मृत्यु | सुरक्षा रक्षक | रईस अहमद अ.गफुर | २८.१२.०४ | मुलगा | **प्रकरण निकाली काढण्यात आले** |
| १६. | संतोषीबाई भवरसिंग | ०१.०९.९१/मृत्यु | स्विपर | संजय भवरसिंग | २७.१२.०२ | मुलगा | **प्रकरण निकाली काढण्यात आले** |
| १७. | गोरख काशिनाथ बर्फे | १६.११.०३/मृत्यु | पा.पु. मजुर | सुमनबाई गोरख बके | ०१.१२.०३ | पत्नी | **प्रकरण निकाली काढण्यात आले** |
| १८. | अशोक सखाराम ढोके | १४.०८.०३/मृत्यु | मजुर | अलका अशोक ढोके | ०७.०९.०४ | पत्नी | **प्रकरण निकाली काढण्यात आले** |
| १९. | शे.इब्राहीम | २९.१२.०४/मृत्यु | मजुर | शे.रहीम शे.इब्राहीम | ०९.०३.०५ | मुलगा | **प्रकरण निकाली काढण्यात आले** |
| २०. | कलाबाई साळुबा कांबळे | २८.१.०५/नि.से.नि. | मजुर | राजु साळुबा कांबळे | १३.०६.०५ | मुलगा | **प्रकरण निकाली काढण्यात आले** |
| २१. | साहेबराव वाघ | ३०.०६.०४/स्वे.नि. | मजुर पा.पु. | लताबाई रणजित वाघ | ०६.०१.०५ | सुन | **प्रकरण निकाली काढण्यात आले** |
| २२. | मथुराबाई साठे | ३१.१.०५/स्वे.से.नि | मजुर | सुधीर रमेश साठे | ०१.०२.०५ | मुलगा | **प्रकरण निकाली काढण्यात आले** |
| २३. | पांडुरंग हिवराळे | २८.२.०५/स्वे.से.नि | मजुर | भाऊसाहेब पांडुरंग हिवराळे | २८.०४.०५ | मुलगा | **प्रकरण निकाली काढण्यात आले** |
| २४. | तुकाराम अंभोरे | २३.५.०१/स्वे.से.नि | सुरक्षा रक्षक | किरण तुकाराम अंभोरे | ३१.०१.०५ | मुलगा | **प्रकरण निकाली काढण्यात आले** |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २५. | लक्ष्मण बंडु वाघ | ३०.४.०५/स्वे.से.नि | मजुर | भारत लक्ष्मण वाघ | ०५.०५.०५ | मुलगा | **प्रकरण निकाली काढण्यात आले** |
| २६. | कौसाबाई लक्ष्मण खरात | ३१.१.०५/स्वे.से.नि | मजुर | मनोहर लक्ष्मण खरात | २८.०५.०५ | मुलगा | **प्रकरण निकाली काढण्यात आले** |
| २७. | फुलाबाई लिंबाजी मगरे | २८.२.०५/स्वे.से.नि | मजुर | किशोर लिबांजी मगरे | ०९.०६.०५ | मुलगा | **प्रकरण निकाली काढण्यात आले** |
| २८. | प्रकाश रामभाऊ पवार | ३१.१.०५/स्वे.से.नि | सफाई मजुर | रवि प्रकाश पवार | ०१.०२.०५ | मुलगा | **प्रकरण निकाली काढण्यात आले** |
| २९. | पदमाबाई छगन सोनवणे | ३१.१.०५/स्वे.से.नि | सफाई मजुर | विलास छगन सोनवणे | १०.०६.०५ | मुलगा | **प्रकरण निकाली काढण्यात आले** |
| ३०. | काशीनाथ कोंडीराम बोर्डे | २८.२.०५/स्वे.से.नि | सफाई मजुर | गौतम काशिनाथ बोर्डे | १६.०५.०५ | मुलगा | **प्रकरण निकाली काढण्यात आले** |
| ३१. | सुखदेव गहनाजी बोर्डे | ३१.५.०५/स्वे.नि. | सफाई मजुर | अंकुश सुखदेव बोर्डे | १५.०६.०५ | मुलगा | **प्रकरण निकाली काढण्यात आले** |
| ३२. | साखराबाई देवीदास दाभाडे | २८.०२.०५/स्वे.नि. | सफाई मजुर | आशा देविदास दाभाडे | १६.०२.०५ | मुलगी | **प्रकरण निकाली काढण्यात आले** |
| ३३. | इंद्राबाई प्रताप चावरिया | २४.११.०४/रूसेनि | स्विपर | राजेश प्रताप चावरिया | २७.०५.०५ | मुलगा | **प्रकरण निकाली काढण्यात आले** |
| ३४. | कामीनीबाई बाजीराव राजगीरे | २५.०४.०४/मृत्यु | सफाई मजुर | मिनाबाई प्रभुदास राजगिरे | ३०.०५.०५ | सुन | **प्रकरण निकाली काढण्यात आले** |
| ३५. | मालनबाई मोतीराम पवार | ३०.०६.०५/स्वे.नि. | सफाई मजुर | मनोज मोतीराम पवार | ०५.०७.०५ | मुलगा | **प्रकरण निकाली काढण्यात आले** |

**संवाद :**

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर :या सभागृहात भ्रष्टाचारा संबधी चर्चा होत आहे चांगली बाब आहे.सर्वांचे अभिनंदन करतो यावरून असे दिसून येते की या महानगरपालिकेला सुध्दा गरज भासली की यातून आपण मूक्त व्हावे म्हणून यापासून निश्चितच महानगरपालिकेस चांगले दिसव येतील.हा विषय अनुकंपा धर्तीवर ज्यांच्या नियुक्त्या केलेल्या आहेत त्या संबधीचा असून या संदर्भात शासनाने नियम घालून दिलेले आहे.याची नियुक्ती करतांना कमेटी नियुक्त केलेली असेल तर तो ही खुलासा करण्यात यावा.आताच काही सदस्य यांनी भ्रष्टाचार झाल्याबध्दल बोलले ज्यांचेकडे पुरावे असतील ते सभागृहात सादर करावे. त्यावर चर्चा करून निर्णय घेता येईल नसता आरोप करून महानगरपालिकेची बदनामी होवू नये.

श्री.अ.रशीद खान :माझ्या वार्डातील एक सुरक्षा रक्षक होते त्याचे जागेवर अनुकंपा धर्तीवर ज्यांना घेतले त्यांना मजूराचे काम दिलेले आहे. मजूर असतील तर मजूर म्हणूनच आदेश दिले पाहिजे.

उपआयुक्त (प्र) : मजूर म्हणून जे कार्यरत होते ते सेवानिवृत्त झाले किंवा त्यांचा मृत्यू झाला त्याचे जागेवर नियुक्ती करतांना मजूर म्हणून दयावी लागेल दुसऱ्या पदाची नेमणूक देता येणार नाही.

श्री. अ. रशीद खान :काही मजूर यांना मजूर म्हणून नियुक्ती दिली असतांना शिपाई म्हणून काम करून घेत आहे. आणि ज्यांना सुरक्षा रक्षक म्हणून नेमणूक दयायची त्यांना मजूर म्हणून काम करून घेत आहे. हे योग्य नाही.

मा.महापौर :ज्यांची नियुक्ती मजूर म्हणून आहे त्यांचेकडून शिपायाचे काम करून घेतो असे किती कर्मचारी आहेत.

श्री.संजय सिरसाट :अनुकंपा वर जे कर्मचारी घेतलेले आहे ते आजपर्यत कामावर रूजू झालेले नाही अशी माझी माहिती आहे. कामावर गेलेले नसतील तर त्यांना नौकरीची गरज आहे किंवा नाही याची मा.आयुक्तांनी चौकशी करून त्याचे जागेवर दुसऱ्यांना संधी दयावी अशी सूचना आपण प्रशासनास करावी.

उपआयुक्त (प्र.) : अनुकंपा धर्तीवर जे ३५ कर्मचारी नियुक्त केले त्यांचेकडून मजूर म्हणून काम करून घेत आहे ते सध्या कार्यरत आहे.मंजूर असून शिपायाचे काम करीत आहे

याची यादी देखिल ११२४ कर्मचाऱ्याच्या भरती संदर्भात जो अहवाल देणार आहेत त्या बरोबर देण्यात येईल

मा.महापौर :ज्यांची नियुक्ती मजूर म्हणून आहेत त्यांचेकडून मजूराचेच काम करून घेण्यात यावे त्यांना शिपाई म्हणून काम देवू नये. तसेच कर्मचाऱ्याना ओळखपत्र देण्यात यावे.विषय क्र ४ मजूर करण्यात येत आहे.मंजूर म्हणून शिपायाचे काम करीत असलेल्यांची संखया किती याचाही अहवाल ११२४कर्मचाऱ्याच्या भरती संदर्भात जो अहवाल देणार आहे त्याबरोबर देण्यात यावा.

मा.आयुक्त :लाड कमेटीचे तसेच अनुकंपा धर्तीवर ज्यांच्या नियुक्त्या करावयाच्या आहेत ते अधिकार आयुक्तांना देण्यात यावे. इतर भरती मधे परीक्षा घेतली जाते तोंडी परीक्षा होते.लाड कमेटी तसेच अनुकंपा धर्तीवर ज्यांना घ्यावयाचे आहे त्यांचे बाबतीत असे नसते. आजही २५ प्रकरणे प्रलंबीत आहे.नियुक्तीचे प्रशासनाला अधिकार दयावे कार्योत्तर मंजूरीसाठी या सभागृहासमोर येईल.

श्री.संजय सिरसाट :अनुकंपावरील काही लोकांना नियुक्त्या दिल्या व नंतर कागदपत्राची पुर्तता केलेली नाही म्हणून पत्र देतात कागदपत्राची पूर्तता लवकर केली नाही तर दुसऱ्या क्रंमाकाचा जो असेल त्याला संधी दिली जाते हे बरोबर नसून नियुक्ती होण्याच्या अगोदरच सर्व कागदपत्रे घेण्यात आली पाहिजे.

श्री.देसरडा प्रशांत :शासनाने ग्रामसेवक भरती ही कंत्राटदार पध्दतीने चालू केलेली आहे. महानगरपालिकेचे बजेट कमी आहे.कंत्राटदार पध्दतीने नोकर भरती महानगरपालिका करू शकते का ?

मा.महापौर :विषय क्र ४ मजूर केलेला आहे. विषय क्र ५ वर चर्चा करावी.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रस्तुत प्रस्तावाच्या यादीतील अनुकंपा तत्वावरील प्रकरणांतील निवड केलेल्या उमदेवारांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ (१) अन्वये सफाई मजूर या पदावर नियूक्ती देण्यांस सर्वानुमते कार्योत्तर मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. ६४/५ :</u>**

शहर अभियंता, यांनी प्रस्ताव सादर केला की, औरंगाबाद शहरास मुख्यत्वे जायकवाडी जलाशयातून ७०० व १२०० मि.मी. व्यासाच्या जुन्या व नविन योजनेद्वारे पाणी पुरवठा करण्यात येतो. मार्च २००५ पर्यंत जुन्या योजनेतून ३९ द.ल.ली. व निवन योजनेतून ८५ द.ल.ली. याप्रमाणे एकूण १२४ द.ल.ली. पाणी नक्षत्रवाडी एम.बी.आर. येथे प्रतिदिन मिळत असे.

शहराची वाढती लोकसंख्या व पाण्याची मागणी पूर्ण करणे शक्य होत नसल्यामुळे सन २००४-२००५ मध्ये महानगरपालिकेच्या विशेष फंडातुन रूपये ७१४.०० लाखाच्या जुन्या व नविन योजनेचे मजबूतीकरण व सक्षमीकरण करण्याचे काम हाती घेण्यात आलेले आहे. ही सर्व कामे पुर्ण झाल्यानंतर नक्षत्रवाडी एम.बी.आर.येथे जुन्या योजनेतून ४६ द.ल.ली. व नविन योजनेतून ९५ द.ल.ली. याप्रमाणे एकूण १४१ द.ल.ली. प्रतिदिन पाणी परिमाण प्राप्त होईल.

सिडको व विस्तारीत भागाकरीता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळातर्फे रूपये ६७.३० कोटी किंमतीची औरंगाबाद वाढीव पाणी पुरवठा योजना तयार करून, सदर योजना २००१ पर्यंत कार्यान्वीत केली जाईल असे गृहीत धरून प्रत्यक्ष कामास सुरूवात करण्यात आली होती. तथापि या योजनेत प्रवाह गतीचा तांत्रिक मुद्दा उपस्थित झाल्यामुळे सदर योजनेतील कामे भविष्यात होतील किंवा नाही याबाबत संभ्रम आहे. या अनुषंगाने व मा.आयुक्त महोदय यांच्या सूचनेनुसार आहे त्या स्थितीत पाणी परिमाणात वाढ करण्याच्या दृष्टीने तांत्रिक गणिते मांडली व या बाबींवर मे.शहा टेक्नीकल कन्सल्टंटचे यांत्रिकी तज्ञ व संकल्पनार्थी श्री.एन.आर.पवनीकर यांचे मार्गदर्शन घेण्यात आले.

प्राप्त मार्गदर्शनानुसार फारोळा जलशुध्दीकरण केंद्रातून चार पंपाद्वारे आज रोजी ८९ द.ल.ली. प्रतिदिन असलेली शुध्द पाण्याची उचल क्षमता ही खाली प्रमाणे कामे करून तांत्रिक बदल केल्यास १०६ ते ११० द.ल.ली.प्रतिदिन एवढे होऊ शकते. त्यामुळे खालीलप्रमाणे कामे करणे आवश्यक आहे.

| | |
|---|---|
| १. साखळी ६८०० मी. वर सर्ज टँक बांधणे | रूपये १२,१२,०००/- |
| २. जायकवाडी नवीन पंप हाऊस येथे पंपीग मशिनरी बसविणे | रूपये ३५,६८,६३४/- |
| ३. अ.फारोळा नवीन पंपगृह येथे शुध्द पाण्याचे पंप बसविणे | रूपये ९९,०९,००५/- |

व अनुषांगीक कामे करणे.

ब.१२१९ मि.मी.व्यासाची Header Main टाकणे. रूपये ४,९८,९३६/-

४. फारोळा जलशुध्दीकरण केंद्र येथे सर्ज सप्रेसर बसविणे. रूपये ११,०२,६५०/-

**एकूण रक्कम– रूपये १,६२,९१,२२५/–**

अशा प्रकारे रूपये ७१४.०० लाख योजनेतील सर्व कामे पुर्ण झाल्यानंतर व प्रस्तावित योजनेतील कामाच्या पुर्णतेनंतर एकूण पाणी परिमाणामध्ये १५५ ते १५७ द.ल.ली. प्रतिदिन पर्यंत वृध्दी होईल व नक्षत्रवाडीएम.बी.आर. येथे एकूण १५१ द.ल.ली. पाणी परिमाण प्राप्त होणार आहे. या वरून एकूण पाणी परिमाणामध्ये २५ ते २६ द.ल.ली. ने वृध्दी होईल.

पाण्याची वाढती मागणी व रूपये ६७.३० कोटी योजनेची सध्यस्थिती विचारात घेता वरील प्रमाणे पाणी परिमाणात वाढ करण्याच्या दृष्टीने आवश्यक त्या कामासाठी एकत्रित अंदाजपत्रक रक्कम रूपये १,६२,९१,२२५/- चा प्रस्ताव मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**संवाद :**

श्री.अ.रशीद खान : यापूर्वी काही काम करण्यात आलेले होते काम केलेले असेल तर केंव्हा करण्यात आले यात नमूद केलेले नाही. किती खर्च झालेला होता. जूने पंप जे निघतील, त्याची किती रक्क्म येणार आहे.

श्री.मुजीब खान :रमजान चा महिणा आहे. मागिल दोन तीन दिवसापूर्वी पिण्याचे पाणी वेळेवर मिळाले नाही म्हणून नागरीकांना त्रास झालेला आहे. सर्व भागात रमजान महिणा हा उपवासचा असतो. या काळात जास्तीत जास्त व वेळेवर पाणी पूरवठा कसा केला जाईल याबाबतीत संबधीत अधिकारी यांना सुचना देण्यात याव्यात. काही भागात रोजा सोडण्याच्या वेळेस पाणी दिले जाते वेळेत बदल करून सायकाळी ६ वाजेच्या अगोदर पाणी सोडण्यात यावे.बारीकॉल्नी. किराडपूरा. तसेच मूजीब कॉलनी भागात अवेळी पाणी येते .व कमी प्रमाणात पाणी येते आपण स्वत: या भागात पाहणी करावी याची दखल घेण्यात यावी.

मा.महापौर :रमजान हा उपवासचा महिणा चालू आहे. ज्या वेळेत पाणी सोडविण्यात येत होते त्याच वेळेस पाणी सोडविण्यात यावे व जास्तीचे पाणी कसे देता येईल यासाठी पाणीपुरवठा विभागाने दक्षता घ्यावी. विषय क्र ५ मजूर करण्यात येत आहे.

श्री. अ.रशिद खान :माझ्या प्रश्नाचा खुलासा करण्यात यावा.

कार्य.अभियंता(पापू) :६७ कोटीच्या योजनेमधे जे काही पंप मशीनरी बसविणार होतो. व पाणी वाढविणार होतो ती योजना काही कारणास्तव तांत्रिक अडचणीमूळे होवू शकणार नाही म्हणून अस्तित्वात असलेल्या पाईपलाईनसाठी जायकवाडी येथे ४५० एचपी चा एक नवीन जास्तीचा तसेच फारोळा दोन ६७० एचपीचे पंप बसवणार आहोत. यातून पाणी वाढवायचे आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, फारोळा जलशुध्दीकरण केंद्रातून चार पंपाद्वारे आज रोजी ८९ द.ल.ली. प्रतिदिन असलेली शुध्द पाण्याची उचल क्षमता ही प्रस्तुत प्रस्तावातील अ.क्र.१ ते ४ ची कामे करून तांत्रिक बदल केल्यास १०६ ते ११० द.ल.ली.प्रतिदिन एवढे होऊ शकते, पाणी परिमाणात वाढ करण्याच्या दृष्टीने अ.क्र.१ ते ४ चे कामासाठी रक्कम रूपये १,६२,९१,२२५/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६५/६ :**

मा.आयुक्त यांनी शिफारस केल्यानुसार, शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहेत की, औरंगाबाद शहराच्या काही मुख्य व महत्वाच्या जागेवर बांधा,वापरा व हस्तांतरीत करा (बीओटी) तत्वावर विकास करणे आवश्यक आहे. औरंगाबाद महानगरपालिकेच्या मालकीच्या महत्वाच्या जागा खालील प्रमाणे आहे.

१. रेल्वेस्टेशन जवळील महापौर बंगल्यालगतच्या जागेत व्यापारी संकुल बांधणे.

२. विकास योजना आरक्षण क्र.२६२ शहानुरवाडी येथे भाजी मार्केट, व्यापारी संकुल व वाहनतळाची (पार्कीग) व्यवस्था करणे.

३. सिध्दार्थ उद्यान येथील प्रवेशद्वार नुतणीकरण करणे, व्यापारी संकुल, रोपवाटीका (नर्सरी) व पार्कींगची व्यवस्था करणे.

४. एम.आय.डी.सी.चिकलठाणा येथील मनपा गरवारे क्रिडासंकुल परीसरात जलतरण तलाव बांधणे.

५. ज्योतीनगर येथील जलतरण तलाव बांधणे.

६. बायजीपुरा येथील मध्यवर्ती जकात नाक्याच्या परीसरात व्यापारी संकुल बांधणे.

७. वसंत भवन येथे व्यापारी संकुल बांधणे.

८. जाफरगेट आठवडी बाजार येथे व्यापारी संकुल बांधणे.

९. औरंगपुरा भाजी मार्केट येथे व्यापारी संकुल बांधणे.

उपरोक्त प्रमाणे असलेल्या जागेवर बीओटी तत्वावर विकासित करण्यासाठी एक समिती स्थापन करणे आवश्यक वाटते करीता मु.प्रा.महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३० व ३१ अन्वये सदरची विशेष/तदर्थ समिती गठीत करण्यासाठी प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

प्रस्तावित बीओटी समिती ही मा.महापौर यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात यावी व समितीमध्ये खालील सदस्यांची नियुक्ती व्हावी.

०१. मा.उपमहापौर

०२. मा.सभापती,स्थायी समिती

०३. मा.सभागृह नेता

०४. मा.विरोधी पक्षनेता

०५. मा.सभापती,शहर सुधार समिती

०६. ज्या प्रभाग समितीच्या कार्यक्षेत्रात प्रकल्प समाविष्ट असेल त्या प्रभाग समितीचे मा.सभापती.

प्रस्तुत समितीने तत्वत: मान्यता दिल्यानंतर प्रशासन निविदेची कार्यवाही सुरू करेल आणि निविदा मान्यतेसाठी मा.स्थायी समितीच्या मार्फत मा.सर्वसाधारण सभेसमोर सादर करेल.

करिता प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**<u>संवाद :</u>**

| | |
|---|---|
| श्री.देसरडा प्रशांत | :वसंत भुवन ही इमारत महानगरपालिकेच्या नावावर नव्हती आता झालेली आहे का याचा खुलासा करावा. |
| श्री.अ.रशिद खान | :डी.पी. प्लॅन मधे काय दर्शविलेले आहे. माझ्या माहिती प्रमाणे ऑफिससाठी जागा आहे. |
| मा.महापौर | :या प्रस्तावानुसार समिती गठीत करायची आहे. दुरूस्तीसह मजूंर करण्यात येत आहे. |

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रस्तुत प्रस्तावातील अ.क्र.१ ते ९ औरंगाबाद महानगरपालिकेच्या मालकीच्या मुख्य व महत्वाच्या जागेवर बांधा,वापरा व हस्तांतरीत करा (बीओटी) तत्वावर विकास करणेस व मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३० व ३१ अन्वये मा.महापौर यांच्या अध्यक्षतेखाली विशेष/तदर्थ समिती गठीत करून समितीमध्ये खालील सदस्यांच्या नियुक्तीस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

०१. मा.उपमहापौर

०२. मा.सभापती,स्थायी समिती

०३. मा.सभागृह नेता

०४. मा.विरोधी पक्षनेता

०५. मा.सभापती,शहर सुधार समिती

०६. ज्या प्रभाग समितीच्या कार्यक्षेत्रात प्रकल्प समाविष्ट असेल त्या प्रभाग समितीचे मा.सभापती.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. ६६/७ :</u>**

कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा यांनी प्रस्ताव सादर केला की, शहरातील पाणी वितरण करण्यासाठी शहराच्या विविध भागात पंपगृहाची उभारणी करण्यात आलेली आहे. येथील पंपाद्वारे शहरातील पाण्याच्या टक्या भरण्यात येतात व नंतर पाणी वितरण करण्यात येते तर काही भागात पंपाद्वारे सरळ वितरण करण्यात येते.

सध्या अस्तित्वात असलेल्या व्यवस्थेनुसार शहराच्या विविध भागात शक्यतो योग्य वेळेत व नागरिकांच्या सोईनुसार पाणी पुरवठ्याचे वेळापत्रक निश्चित करण्यात आलेले आहे. औरंगाबाद पाणी पुरवठा योजनेद्वारे सुरळीतपणे पाणी पुरवठा झाल्यास वेळापत्रकानुसार पाणी पुरवठा करण्यात येत असे. परंतु माहे डिसेंबर २००४ पासून महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीतर्फे शहराच्या सर्व भागात वेगवेगळ्यावेळी ३ ते ४ तास पर्यंत भारनियमन सुरू झाल्यामुळे त्या भागात असलेल्या पंपगृहाचा विद्युत पुरवठा खंडीत होवून पंपीग बंद होते व त्यामुळे पाण्याच्या टाकी भरण्यास विलंब होत आहे. पर्यायाने पाणी वितरणासाठी लिंब होत आहे. बहुतेक भागात एक दिवसाआड पाणी पुरवठा होतो. अशा परिस्थितीत विद्युत खंडणामुळे पाणी पुरवठा ठरलेल्या वेळापत्रकानुसार करणे अशक्य होत असून, काही भागात नाविलाजने रात्री अवेळी पाणी पुरवठा करावा लागतो तर काही वेळेस दुसऱ्या दिवशी पाणी पुरवठा करावा लागतो. एकंदर आजची पाणी पुरवठा व्यवस्था पाहता दिवसातील २४ तासांपैकी २० ते २२ तास पंपीग चालू असते व त्याद्वारे पाणी पुरवठा करण्यात येतो. यामध्ये जर ०४ तासाचे भारनियमन झाले तर त्या दिवशी असलेल्या पाणी पुरवठा शेवटच्या टप्प्यास पाणी पुरवठा होवू शकत नाही.

पाणी पुरवठ्यासाठी असलेल्या पंपीग स्टेशनच्या भागात भारनियमन करू नये यासाठी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीस विनंती करण्यात आलेली होती., परंतु कंपनीने भारनियमन रद्द करणेस असमर्थता दर्शविली व विद्युत खंडणामुळे पाणी पुरवठा विस्कळीत होवू नये यासाठी पंपगृहासाठी ११ के.व्ही. स्वतंत्र विद्युत वाहिनी टाकण्याचे सूचविले आहे. या कामासाठी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या कोटेशन नुसार खालील प्रमाणे खर्च येतो.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जिन्सी पंपगृह | रूपये | ७,०४,०१५/- |
| २. | सिडको एन-७ पंपगृह | रूपये | ७,५३,१३७/- |
| ३. | ज्युब्लीपार्क पंपगृह | रूपये | ९,८६,६४२/- |
| ४. | शहागंज पंपगृह | रूपये | १९,०६,२६५/- |
| ५. | दिल्लीगेट पंपगृह | रूपये | ५२,७८,४५४/- |
| ६. | सिडको एन-५ पंपगृह | रूपये | १२,०३,८५०/- |
| | | **रूपये** | **१,०८,२६,३६३/-** |

वरील प्रमाणे रक्कम रूपये १,०८,२६,३६३/- महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीस एक रक्कमी रक्कम अदा करावी लागेल. त्यानंतर कंपनीतर्फे विद्युत वाहिनी जोडण्याचे काम हाती घेण्यात येईल. या कामासाठी अर्थसंकल्पात स्वतंत्र आर्थिक तरतुद ठेवण्यात आलेली नाही. त्यामुळे पाणी पुरवठा विभागातील नविन कामांसाठी ठेवण्यात आलेली तरतुद यासाठी वळती करून तरतुद उपलब्ध करावी लागेल. मा.आयुक्त महोदयांनी सदरील कामासाठी येणाऱ्या खर्चासह तरतुद उपलब्ध करणेस शिफारस केलेली आहे.

मागील वर्षाच्या उन्हाळ्यामध्ये सदर भारनियमनाचा त्रास शहरातील नागरिकांनी भोगला आहे. सध्या पावसाळ्याचे दिवस असल्यामुळे भारनियमन काही प्रमाणात कमी झालेले आहे. तथापी भविष्यात भारनियमन कालावधीत परत वाढ होवू शकते. विद्युत खंडणामुळे पाणी पुरवठा विस्कळीत होवू नये यासाठी स्वतंत्र विद्युत वाहिनी जोडणे गरजेचे आहे. तरी या कामासाठी रूपये १,०८,२६,३६३/- च्या खर्चासह तरतुद उपलब्ध करणेसाठी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

मा.महापौर : मंजूर करण्यात येत आहे.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, अ.क्र.१ ते ६ ठिकाणच्या पाणी पुरवठा पंपींग स्टेशनच्या भागात भारनियमनमूळे पाणी पुरवठा विस्कळीत होवू नये यासाठी ११ के.व्ही. स्वतंत्र विद्युत वाहिनी टाकणेच्या कामासाठी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या कोटेशननुसार रूपये १,०८,२६,३६३/- इतकी रक्कम महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी यांचेकडे जमा करण्यास आणि अर्थसंकल्पात पाणी पुरवठा विभागातील नविन कामांसाठी ठेवण्यात आलेली तरतुद वळती करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. ६७/८ :</u>**

आरोग्य वैद्यकीय अधिकारी, महानगरपालिका औरंगाबाद हे प्रस्ताव सादर करीत आहे की, महानगरपालिका क्षेत्रातील जैविक कचरा निर्माण करणाऱ्या सर्व प्रकारचे वैद्यकीय व्यावसायिक रूग्णालय, दवाखाने, रक्त पेढ्या, प्रयोगशाळा, विज्ञान, वैद्यकीय पशू वैद्यकीय महाविद्यालय, संशोधन संस्था,

कत्तलखाना, पशूवैद्यकीय दवाखाने/रूग्णालय,गोठे, तबेले,कुकूटपालन केंद्र, दुध व्यवसाय केंद्र इत्यादी ॲक्युपायर म्हणजे जैविक कचऱ्याची निर्मिती करणाऱ्यांनी जैविक कचऱ्याची शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट लावणे बंधनकारक असल्याने महानगरपालिकेने शहरातील सर्व ॲक्यूपायरना कॉमन फॅसिल्टी अंतर्गत जैविक कचरा प्रकल्प दिनांक ०१.११.२००३ उपलब्ध करून दिलेली आहे.

मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.५३४/२ दिनांक २०.१२.२००१ अन्वये जैविक कचरा ॲक्यूपायर कडून नियमितपणे स्विकारून (गोळा करून) त्याचे परिवहन व शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट करण्यासाठी सेवा शुल्क दर निश्चित करण्यात आलेले आहे.

मे.वॉटर ग्रेस प्रॉडक्ट्स,नाशिक (ठेकेदार) व महानगरपालिका औरंगाबाद यांनी जैविक कचरा प्रकल्प कार्यान्वीत करण्याकरीता दिनांक १९.०९.२००२ ला करारनामा केलेला आहे.

दिनांक ०१.११.२००३ पासून सदरील जैविक कचरा प्रकल्प कार्यान्वीत करण्यात आला असून करारनाम्यातील अटी व शर्ती व मा.सर्वसाधारण सभेने निश्चित केलेल्या सेवा शुल्क दराप्रमाणे ॲक्यूपायर कडून (सभासद) मासिक शुल्क वसूल करण्याचे कार्यवाही करण्यात येते. तथापि इंडियन मेडीकल असोशिएशन, इंडियन डेंटल असोशियन, इंपस,नॅशनल इंट्रीग्रेट मेडीकल असोशियन इत्यादी वैद्यकीय संस्था व ॲक्यूपायर यांनी मासिक सेवा शुल्क कमी करण्याबाबत मनपा प्रशासनास अनेकवेळा विनंती केलेली आहे. यासंबंधी मा.सर्वसाधारण सभेत दिनांक ०५.०८.२००४ रोजी मा.स.न.श्री.जयंत ओक व स.न.श्री.रणधिर होलिये स.नगरसेवक यांनी अप्रशासकीय प्रस्ताव सादर करून जैविक कचरा मासिक सेवा शुल्क दर कमी करण्याबाबत प्रस्ताव सादर केला होता. त्यानुषंगाने ठराव क्र.४२२/१ दिनांक ५.८.२००४ अन्वये ठराव मंजूर करण्यात आलेला आहे.

प्रशासनाच्या वतीने जैविक कचरा मासिक सेवा शुल्क याबाबत सल्लागार समितीची स्थापना करण्यात आली असून सल्लागार समितीच्या शिफारशीनुसार दिनांक १६.०८.२००५ रोजी ॲक्यूपायर विविध वैद्यकीय संघटनेचे पदाधिकारी, ठेकेदार व मनपा प्रशासन यांची मा.आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांच्या दालनात सेवा शुल्क दर सर्व समंतीने निश्चित करण्याकरीता बैठक झाली. यात ठेकेदार व मनपा प्रशासनाच्या वतीने करारनाम्यातील अटी व शर्तींना अधिन राहून दिनांक २०.१२.२००१ च्या मा.सर्वसाधारण सभेने मंजूर केलेल्या सेवा शुल्क दरात खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात आली आहे.

| | |
|---|---|
| सुधारीत आजीवन सभासद शुल्क | रू.५००/- |
| फॉर्म फि | रू. १०/- |

ॲक्यूपायरकडून नियमितपणे स्विकारून व त्याचे परिवहन व शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट लावण्यासाठी सुधारीत सेवा शुल्क दर दिनांक ०१.०४.२००५ पासून खालीलप्रमाणे प्रस्तावित करण्यात आलेले आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | १ ते ४ खाटा | रू.३५०/- प्रतिमाह |
| २. | ५ ते ५० खाटा | रू.३/- प्रतिदिन/प्रतीखाट |
| ३. | ५१ ते २०० खाटा | रू.२.५०/- प्रतिदिन/प्रतीखाट |
| ४. | २०१ ते ५०० खाटा | रू.२.५०/-प्रतिदिन/प्रतीखाट |
| ५. | ५०१ ते पूढे | रू.२/- प्रतिदिन/प्रतीखाट |
| ६. | सल्लाकक्ष | रू.१५०/- प्रतिमाह |
| ७. | दवाखाना सर्व चिकीत्सा पध्दती | रू.१५०/- प्रतिमाह किंवा संपूर्ण वर्षाचे एकदाच पैसे भरले तर रू.१२५/- प्रतिमाह |
| ८. | दंत शल्स चिकीत्सक | रू.२५०/- प्रतिमाह |
| ९. | पॅथालॉजी, प्रयोगशाळा रक्तपेढी, विर्यपेढी,अवयव प्रत्यारोपन केंद्र इ. | रू.३५०/- प्रतिमाह |
| १०. | गुरांचे दवाखाने, रूग्णालय,कृत्रिम रोपन केंद्र कुकुट पालन केंद्र,दुग्ध व्यवसाय केंद्र | रू.३५०/- प्रतिमाह |
| ११. | सर्व विज्ञान विद्यालय/महाविद्यालय | रू.२५०/- प्रतिमाह |
| १२. | इतर सर्व ॲक्यूपायर | रू.२५०/- प्रतिमाह |

मे.वॉटर ग्रेस प्रॉडक्ट्स, नाशिक ठेकेदार श्री.चेतन पृथ्वीराज बोरा व महानगरपालिका,औरंगाबाद यांच्यात दिनांक १९.०९.२००२ रोजी झालेल्या करारनाम्यातील अटी व शर्ती यांना अधिन राहून खालील अटी व शर्तीची समावेश करण्यात येत आहे.

✼ प्रस्तावित केलेले सुधारित सेवा शुल्क दर दिनांक १.४.२००५ ते ३१.३.२००६ पर्यंत पासून लागू राहतील. दिनांक १.४.२००६ पासून सुधारित सेवा शुल्क दरात प्रतिवर्ष ८% दरवाढ केली जाईल. त्यानुसार दर आकारण्यात येतील.

✼ सभासदाकडे (ॲक्यूपायर) जैविक कचरा उचलण्यास वाहन न गेल्यास (४८ तासामध्ये ) प्रती दिवस रू.५०/- प्रती (सदरील दवाखाना/हॉस्पीटल) प्रमाणे ठेकेदारास दंड आकारण्यात येईल.

✼ ॲक्यूपायरने प्रत्येक महिन्याच्या १० तारखेच्या आता सेवाशुल्क न भरल्यास पूढील प्रत्येक १० दिवसासाठी रू.५०/- दंड आकारण्यात येईल.

✼ दिनांक १.११.२००३ पासून जे जैविक कचरा प्रकल्पाचे सदस्य झालेले आहेत, परंतू या प्रकल्पाच्या सेवा काही कारणास्तव घेतलेल्या नाहीत किंवा मिळालेल्या नाहीत, अशा काही सदस्यांना रू.१.५० प्रतिखाट प्रमाणे दर आकारून दिनांक ३१.०३.२००५ पर्यंत देयके अदा करून यापूढे नियमित सेवा घ्यावी व ठेकेदाराने नियमित सेवा द्यावी.

वरील प्रमाणे प्रस्तावित सुधारित सेवा शुल्क दर व सुधारीत अटी व शर्ती यांचा समावेश केल्यास मनपा क्षेत्रातील जैविक कचरा निर्माण करणाऱ्या संस्थाना जैविक कचरा प्रकल्पाचे सभासद करून घेऊन नियमित सेवा शुल्क वसूल करण्यात येईल. करिता जैविक कचरा सुधारीत सेवा शुल्क दर व सुधारीत अटी व शर्ती मा.सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

श्री.जोशी संजय :इंडियन मेडीकल असोसिएशन व अन्य संस्थानी ज्यावेळेला लागू केले त्यावेळेस निवेदने दिली की दर हे जास्त होत आहेत म्हणून त्यावेळेस प्रशासनाने दुर्लक्ष केले व दर वाढवून मंजूरीसाठी सभागृहासमोर सादर केले होते. आता दर कमी करून पुन्हा प्रस्ताव सादर केलेला आहे. असे का याचा खुलासा करावा ज्या एजन्सीजशी करार झालेला आहे त्याचा फायदा प्रशासन करीत आहे का ?

श्री.केनेकर संजय :या संबधीची माहिती मी मागविलेली होती सभागृहाला माहिती दयावी म्हणून विनंती केलेली होती माहिती देण्यात आलेली नाही.जनतेकडून रक्क्म वसूल करायची व विना मुल्य दुसऱ्यांना दयायची अशी ही योजना आहे असे वाटते.

श्री.अ.रशिद खॉन :४/-रूपये ऐवजी ३ रूपये करण्यात आले ८ टक्के करण्यात आले किती दिवसासाठी किती वर्षासाठी यात नमूद केलेले नाही. अलोपॅथीक , होमिओपॅथिक दवाखाना साठी काय दर ठेवलेले आहे जे डॉक्टर साध्या गोळया देतात त्यांना सुध्दा सभासद केलेले आहे..

श्री.केनेकर संजय : काही दवाखान्याचे खाट हे ४०० तर काहीचे ४० दाखविलेले आहे केवळ पैसे भरून घेण्यासाठी दाखविलेले आहे प्रशासनाचा सुध्दा यात हात आहे.

आरोग्य वैद्य अधिकारी :अगोदर माझा परीचय देणे हे माझे कर्तव्य समजतो मी डॉ. पंडीत रामकृष्ण कुलकर्णी १२ सप्टेंबर २००५ रोजी वैद्यकीय आरोग्य अधिकारी म्हणून महानगरपालिकेमधे रूजू झालो. या ठरावाच्या अनुशंगाने हा प्रकल्प हाती घेतला त्यावेळी इतर ठिकाणी जे दर लागू आहे त्यानुसार दर प्रस्तावित केलेले होते बाकीच्या ज्या संघटना आहे ज्याचेकडून वसूली करणार होतो ज्यांना ही सेवा देणार होतो त्यांनी प्रतिनिधीत्व केल्यामूळे मा. आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली १६.८.२००५ रोजी बैठक झाली त्यामध्ये आयएमएचे प्रतिनिधी ,डेन्टल समितीचे प्रतिनिधी आणि वैद्यकीय आरोग्य अधिकारी हे होते. चर्चा केल्यानंतर हे नवीन दर प्रस्तावित केलेले आहे सुरूवातीचे दर या संस्थाचे प्रतिनिधीनी जास्त होतात म्हणून तेंव्हा कार्यवाही झालेली नाही आता त्यांचेशी चर्चा करून दर प्रस्तावित करण्यात आलेले आहे.

श्री.जोशी संजय : यापूर्वीही या संस्थाचे प्रतिनिधी मा.आयुक्त यांची भेट घेतलेली होती परंतू दर कमी होणार नाही असे सांगण्यात आले होते. आता दर कमी करण्याची का आवशकता भासली.

आरोग्य वैद्य. अधिकारी :त्यावेळेस प्रतिनिधी यांचेशी बैठक झालेली नव्हती पूर्वीचे जे दर होते ते इतर ठिकाणी जे होते ते नमूद केलेले होते.

श्री.अ.रशिद खान :२१ वर्षाचा करार आहे असे म्हटले महानगरपालिकेच्या दवाखान्याचा खर्च कोण करणार आहे. त्याचाही खुलासा करावा.

आरोग्य वैद्य अधिकारी : दिं१६.८.२००५ रोजी सर्व संस्थाचे प्रतिनिधी बैठकीला होते जो पर्यत दर कमी होणार नाही तोपर्यत सभासद होण्यास तयार नव्हते. त्यावेळेस दर कमी केले नव्हते त्यावेळी वैयक्तिकरित्या संघटनेचे प्रतिनिधी येवून भेटले होते.

श्री. संजय केनेकर :ज्या एजन्सीच्या इन्सीनेटरमधे मटेरियल जाळले जाते त्या मशीनची क्षमता काय याचाही खुलासा करावा.

डॉ. आशा बिनवडे :दिनांक १.११.०३ पासून जे जैविक कचरा प्रकल्पाचे सदस्य झालेले आहेत परंतू या प्रकल्पाच्या सेवा काही कारणास्तव घेतलेल्या नाहीत अशा काही सदस्यांना रूपये १.५० प्रति खाट आकारून दिनांक ३१.३.२००५ पर्यतचे देयके अदा करून त्यापूढे नियमित सेवा घ्यावी व ठेकेदाराने नियमित सेवा दयावी. ज्या सुविधाच मिळाल्या नाही त्याचेसाठी पैसे घेणे अतिशय चुकीचे होईल. असे पैसे घेता येणार नाही. पूढील सेवा देण्यातयावी मागिल कोणतेही दर आकारू नये.

आरोग्य वैद्य. अधिकारी : त्यांना सेवा दिली नाही जे की ते वर्गणीदार झालेले नाही. जे वर्गणीदार झाले त्यांनाच सेवा दिलेल्या होत्या

श्री.देसरडा प्रशांत :सभासद व्हावे असे बंधन नाही. ज्या दिवशीपासून सूविधा देणार तेव्हापासून दर लावावे. माझ्या वार्डात काही डॉक्टर आहे. त्यांना मागिल थकबाकीची नोटीस आजही येते. जेंव्हा सेवा देणार तेंव्हापासून ते देण्यास तयार आहे.

श्री. बैनाडे कवरसिंग :सिडको हडको भागातील डॉक्टरांना सेवाच दिली नाही तर त्यांना नोटीसा का देण्यात येतात.

श्री.देसरडा प्रशांत : अनेक डॉक्टरांनी तक्रारी दिलेल्या आहेत की कचरा उचलला जात नाही महानगरपालिकेच्या दवाखान्यातील डॉक्टरांची सुध्दा तक्रार आहे की कचरा उचलला जात नाही. अनेकांच्या तक्रारी आहेत संबधीत एजन्सीवर आतापर्यत काय कार्यवाही करण्यात आलेली आहे.करारामधे असे की एक दिवस कचरा उचलला नाही तर त्या एजन्सीला प्रत्येक दिवसाचा दंडात्मक कार्यवाही आकारू शकतो.

श्री. केनेकर संजय : ज्या एजन्सीला काम दिले करारा प्रमाणे रक्क्म दिली जाते. सेवा देत नाही करार रद्य करावा अशी विनंती आहे.

मा.महापौर :डॉक्टराच्या तक्रारी आहेत असे स.सदस्य श्री देसरडा यांनी म्हटले आहे हे सत्य आहे का.

आरोग्य वैद्य अधिकारी :या संबधी खात्री करून घेण्यात येईल व त्यानंतर माहिती देण्यात येईल.

श्री.जोशी संजय :माहिती घेवून पूढील बैठकीत मंजूर करावा.

मा.उपमहापौर यापूर्वी बरेच डॉक्टर मंडळी शिष्टमंडळ घेवून येथै आलेले होते. परंतू दर कमी करण्यात आलेले नाही पदाधिकारी यांनी सम्म्ती देवूनही कार्यवाही केलेली नव्हती.दर कमी केले तर परीणाम होईल असे प्रशासनाने ठणकावून सांगितलेले होते.आता पुन्हा दर कमी करण्याचा प्रस्ताव मंजूरीसाठी येतो . दर कमी करावे असे मत सभागृहाचे नाही डॉक्टरांना न्याय मिळालाच पाहिजे. अमुक करावेच लागेल या नावाखाली हे काम चालूच राहिले. खाटाची रक्कम कमी केली तर संबधीत ठेकेदार यांना ८ टक्के रक्क्म दयायची असे आताच स.सदस्य श्री अ. रशिद खान मामू यांनी म्हटले. प्रकल्पापेक्षा ५ ते १० पटीने रक्क्म त्यास दयावयाची असा त्याचा अर्थ होतो. बोओटी पेक्षा हा करार वेगळाच वाटतो.सरळ सभागृहाची दिशाभूल करणारा आहे संबधीत संस्थाचा करार रद्य करावा समिती गठीत करावी जे रक्क्म कमी करायची ते समीतीच्या मार्फत पुन्हा संघटनेचे प्रतिनिधी याना चर्चेसाठी बोलवावे त्या पदाधिकाऱ्यांशी चर्चा करून निर्णय घेण्यात यावा.

श्री.केनेकर संजय :सन ०३ ते ०५ या काळात या एजन्सीकडून जो महसूल प्राप्त झाला तो २१ टक्के आहे व संबधीत एजन्सीला महानगरपालिकेने ७९ टकके रक्क्म दिलेली आहे इतका फरक कसा ?

श्री.अ.रशिद खान : यापूर्वी अनेक प्रतिनिधी नगरसेवक पदाधिकारी अधिकारी यांना भेटले होते. परंतू दर कमी करता येणार नाही असे सांगण्यात आले. संबधीत एजन्सी मालक यांचेशी प्रशासनाने चर्चा केली त्या नंतर ठराव या सभागृहात आला होता. सभागृह मोठे की अधिकारी असा प्रश्न पडतो.

श्री.पाथ्रीकर दत्ताभाऊ :२१ वर्षाचा करार होवू शकत नाही. ठराव कोणी ठेवला तसेच जी एजन्सी काम करते ती किती वर्षापासून काम करते .जी एजन्सी काम करते त्यांनी महानगरपालिकेच्या दवाखान्याची सेवा ही मोफत करून दिली पाहिजे.

श्री.केनेकर संजय :महानगरपालिकेच्या दवाखान्यासाठी सदर जी कोणती एजन्सी काम करेल त्यांनी सेवा मोफत दिली पाहिजे.

श्री.संजय सिरसाट :मा.आयुक्तांच्या दालनात सदर समितीचे लोकांना बोलवून निर्णय झाला . समितीमधे कोण होते माहित नाही. नाशिकची एजन्सी आहे. या एजन्सी बाबत अनेक लोकांच्या तक्रारी आहेत आजचा दर हा ३ रूपये ठेवायचा व त्यानंतर ८ टक्के प्रमाणे वाढ करायची मुळात हा प्रस्तावच चुकीचा आहे . जे डॉक्टर या शहरात आहे त्यांना प्रतिखाट हा २.५० रूपये दर आकारण्यात यावा म्हणून सदस्यांनी प्रस्ताव दिला होता. त्यास बगल देवून ३ /-रूपये प्रमाणे ठेवून त्यात ८ टक्केची वाढ केलेली आहे. हा ठराव रद्य करण्यात यावा.ज्या ठेकेदारा बरोबर करार केलेला आहे २१वर्षाचा करार असून माझ्या माहिती प्रमाणे ज्या ज्या वेळेस डिजेल पेट्रोलची भाववाढ होईल त्या त्या वेळी जास्त पैसे देणार आहोत असे करारामधे आहे. २२ महिण्यात सदर ठैकेदारानी ५० लक्षची मशीनरी उभी केली. दोन लोक रिक्षात येतात व जैविक कचरा घेवून जातात. काही स.सदस्य यांनी प्रत्यक्ष भेट दिली होती. तेथील युनीट बंद होते ते डायरेक्ट जैविक कचरा नाशिकला घेवून जात होते. आणि महानगरपालिकेने संबधीत ठैकेदाराला २२ महिण्यात १८.५४ लक्ष रूपये देण्यात आले. महानगरपालिका ही सेवा भावी संस्था असेल तर जनतेला सेवा दयायची असेल तर रॉयल्टी घेण्याची गरज नाही. डॉक्टराबध्दल आपण सहानुभूती दाखवतो त्याचे हिताचे निर्णय घेतो परंतू त्याचेकडून सुध्दा ५.५१ लक्ष रूपये रॉयल्टी घेतलेली आहे.जे डॉक्टर सेवा देतात. त्याचेकडून ठेकेदारामार्फत वसूली करण्याचे काम सुरू झालेले आहे ते बंद करावे ही माझी मागणी आहे. सभागृहाला माहिती नाही आयुक्त त्यांचे दालनात संबधीताना बोलवून चर्चा करतात निर्णय घेतात हे अधिकार त्यांना कोणी दिले. ८ टक्के प्रमाणे एवढी रक्क्म वाढत जाईल की एक खाटाचा दर हा रूपये ८ ते ९ होतो. ठैकेदारानी कदाचित मा.आयुक्तांना चांगली कल्पना दिली असेल. परंतू डॉक्टराकडून जास्त पैसे वसूल होत आहे. अनेक विकास कामासाठी महानगरपालिका लाखो खर्च करतो.५० लक्षचे हे यूनिट असून ही योजना महानगरपालिकेनेच चालवावी जो करार आहे तो रद्य करण्यात यावा अशी माझी मागणी आहे.या शहरात जे डॉक्टर आहेत त्यांना १.५० रूपया किंवा २.०० दर आकारावेत महानगरपालिकेने चालवावी अशी विनंती आहे.

श्री.केनेकर संजय :करारापोटी वेगळा पैसा घेतात तसेच बाहेरील इतर कचरा जाळतात त्याचे वेगळे पैसे घेतात.

श्री.संजय सिरसाट :ठेकेदाराची मागणी ही जी सभासंदाकडे बाकी आहे ती ३३.७० लक्ष दाखविण्यात आलेली आहे वसुली ही २६.५२ लक्ष आहे. शहरातील डॉक्टर मंडळी यांना पदाधिकारी व काही स.सदस्य यांनी भेटही घेतलेली आहे व आम्हाला महानगरपालिकेच्या उत्पन्नात वाढ करायची परंतू या दरामूळे खाटा वाढवाव्यात की कमी कराव्यात असा प्रश्न त्यांचेसमोर पडलेला आहे. या कंपनीबरोबर करार

रद्द करून प्रत्येक खाटासाठी २.०० रूपये आकारावे व ही योजना महानगरपालिकेमार्फत चालवावी.

मा.महापौर : स.सदस्य श्री.शिरसाट यांनी जो मुद्दा उपस्थित केला तसे करता येईल का, मा.आयुक्तांनी खुलासा करावा.

उपआयुक्त (म.) : अशा प्रकारे प्रक्रिया करण्याची व्यवस्था सध्या महानगरपालिकेकडे नसल्यामूळे पूढील व्यवस्था होईपर्यंत हा करार रद्द करता येणार नाही.

श्री.सिरसाट संजय :महानगरपालिकेने त्या एजन्सीला जागा दिलेली आहे. महानगरपालिकेच्या जागेवर युनीट कार्यान्वित आहे.भरपाई पोटी आणखी रक्क्म देण्याची गरज पडली तरी ती दयावी परंतू करार रद्द करावा. २२ महिण्यामधे संबधीतांने २६ लक्ष रूपये वसूल केलेले आहे. आणखी ३६ लक्षची थकबाकी सुध्दा दाखविल्या जाते.

मा.महापौर : करार करून दिलेला असूतांना हा प्रस्ताव कशासाठी ठेवलेला आहे. खुलासा करावा.

श्री.देसरडा प्रशांत :सत्यमचे प्रपोजल सुध्दा पूर्णपणे आता बंद आहे. एजन्सीबरोबर जो करारनामा केलेला आहे व त्यानुसार काय सेवा दिली पाहिजे याची तफावत झालेली आहे याची चौकशी केली पाहिजे अशी माझी मागणी आहे. चौकशीनंतर हा करारनामा रद्द करावा.

श्री.केनेकर संजय : करार नामा रद्द करण्यात यावा.

श्री.अ.रशिद खॉन :हा प्रस्ताव स्थगित ठेवण्यात यावा कमेटी नियुक्त करावी. चर्चा करावी. त्यानंतर पून्हा मंजूरीसाठी ठेवण्यात यावा.नसता रद्द करण्यात यावे.

मा.महापौर : हा विषय स्थगित ठेवण्यात येत आहे. यावर एक समिती स्थापन करून करार रद्द करता येईल किंवा जी २५ टक्के रॉयल्टी महानगरपालिका घेते ती न घेता डॉक्टरांना आणखी काही सवलत देता येईल किंवा ३.५० रूपये पेक्षा आणखी काही कमी करता येईल का? हा ठेका रद्द करून महानगरपालिकेला चालविता येईल का या बाबतीत महानगरपालिकेचे पदाधिकारी पाच सदस्यांची कमेटी नियुक्त करून निर्णय घेतला जाईल. तोपर्यत हा प्रस्ताव स्थगित ठेवण्यात येत आहे.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तुत प्रस्तावा संबंधी एक समिती स्थापन करून करार रद्द करता येईल किंवा जी २५ टक्के रॉयल्टी महानगरपालिका घेते ती न घेता डॉक्टरांना आणखी काही सवलत देता येईल किंवा ३.५० रूपये पेक्षा आणखी काही कमी करता येईल का, हा ठेका रद्द करून महानगरपालिकेला चालविता येईल का, या बाबतीत महानगरपालिकेचे पदाधिकारी, पाच सदस्यांची कमेटी नियुक्त करून निर्णय घेणेस व तोपर्यत हा प्रस्ताव स्थगित ठेवण्यास सर्वानुमते मान्यता देण्यांत आली.

**<u>विषय क्र. ६८/९ :</u>**

कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद पाणी पुरवठा योजनेच्या टप्पे निहाय पुनर्रबांधणी टप्पा-१ (योजनेचे सशक्तीकरण) अंतर्गत रूपये ७१४.०० लाखाच्या कामाच्या (भांडवली कामे, स्थापत्य व यांत्रिकी) प्रस्तावास मा.सर्वसाधारण सभा विषय क्र.४१६/४ दिनांक ०५.०८.२००४ अन्वये मान्यता झालेली आहे. अंदाजपत्रक रक्कम रूपये ७१४.०० लक्ष किमंतीच्या रक्कमे अंतर्गत (भाग-अ) रूपये २६३.८२ लक्ष किमंतीच्या स्थापत्य कामांचा समावेश आहे. या कामासाठी महानगरपालिका निविदा सूचना क्र.मनपा/लेखा/४७/०४ दिनांक १०.०८.२००४ नुसार निविदा प्रसिध्द करण्यात आल्या.

निविदा सूचना क्र.मनपा/लेखा/४७/०४ दिनांक १०.०८.२००४ मधील अ.क्र.०५ चे काम हे औरंगाबाद पाणी पुरवठा योजनेवरील मुख्य जलवाहिनीवरील पाणी ग्राहंकाकरीता जलशुध्दीकरण केंद्र फारोळा ते अलाना कंपनी पर्यंत डी.आय.के.९ पाईपमध्ये सर्व उपांगासह उध्दरण नलिका टाकणे या कामाची निविदा रक्कम रूपये १३४.८२ लक्ष किमंतीची होती. निविदा विक्रीच्या शेवटच्या दि.२३.०८.२००४ पर्यंत या कामा करीता एकूण आठ कोऱ्या निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकृती दिनांक ३०.०८.२००४ रोजी दर भरलेल्या चार सिलबंद निविदा प्राप्त झाल्या, त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

**अंदाजपत्रकीय दरापेक्षा**

| | | | |
|---|---|---|---|
| ०१. | मे.एस.बी.इंजिनिअर्स | - | २८.१०% जास्त<br>१८.२०% जास्त (एक्साईज वगळून) |
| ०२. | मे.एल.के.कन्स्ट्रक्शन | - | ३५% जास्त<br>२२% जास्त (एक्साईज वगळून) |
| ०३. | श्री.व्हि.आर.महाजन | - | ३७% जास्त दराने |
| ०४. | मे.के.बी.कन्स्ट्रक्शन,बुलढाणा | - | ४१.९०% जास्त दराने |

वरील प्रमाणे प्राप्त निविदेचा तुलनात्मकदृष्ट्या विचार करता मे.एस.बी.इंजिनिअर्स, औरंगाबाद यांचे दर हे सर्वात कमी म्हणजे, अंदाजपत्रकीय दरापेक्षा २८.१०% जास्त दराने होते. सदरचे दर जास्त वाटत असल्याने संबंधीतास दिनांक २३.११.२००४ रोजी दराच्या वाटाघाटी करणेसाठी बोलाविण्यात आले. वाटाघाटीमध्ये संबंधीत कंत्राटदारांनी ०.५०% दर कमी करण्याची तयारी दर्शविली. तथापी सदर दर कार्यालयास मान्य नसल्याने मा.आयुक्त यांची मान्यता दिनांक १७.१२.२००४ नुसार अल्प मुदतीची फेर निविदा काढण्याचा निर्णय झाला.

त्यानुषंगाने निविदा सूचना क्र.मनपा/लेखा/१०७/०४ दिनांक २०.१२.२००४ अन्वये फेर निविदा मागविण्यात आल्या असता, निविदा विक्रीच्या शेवटच्या दि.३१.१२.२००४ पर्यंत या कामाकरीता एकूण सहा कोऱ्या निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकृती दिनांक ११.०१.२००५ रोजी दर भरलेल्या तीन सिलबंद निविदा प्राप्त झाल्या, त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

**अंदाजपत्रकीय दरापेक्षा**

| | | | |
|---|---|---|---|
| ०१. | मे.एल.के.कन्स्ट्रक्शन | - | १९.९८% जास्त दराने |
| ०२. | मे.एस.बी.इंजिनिअर्स | - | २५.०४% जास्त दराने |
| ०३. | श्री.व्हि.आर.महाजन | - | २८% जास्त दराने |

प्राप्त निविदापैकी मे.एल.के.कन्स्ट्रक्शन यांची निविदा सर्व वैधानिक कार्यवाही नंतर मान्य करण्यात आली. तसेच दिनांक १७.०२.२००५ रोजी संपन्न झालेल्या मा.स्थायी समितीच्या सभेतही या निविदेला मान्यता प्राप्त झालेली आहे. त्यानुसार मे.एल.के.कन्स्ट्रक्शन यांना दिनांक ०५.०३.२००५ रोजी कार्यादेश देण्यात आले व त्यानुसार संबंधीत यंत्रणेने कामही सुरू केले.

सदरील कामाअंतर्गत टाकण्यात येणारी जलवाहिनी पैठण राज्य रस्ता क्र.३० च्या रस्त्याच्या बाजूने टाकणे प्रस्तावित आहे. त्यासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याकडे नियमानुसार महानगरपालिकेने रस्ता निरिक्षण, परिक्षण व दुरूस्ती पोटी रूपये ३.३६ लाख व अनामत रक्कम रूपये ०.२५ लाख असे एकूण रूपये ३.६१ लक्ष भरणे आवश्यक आहे. या रक्कमेचा समावेश मूळ अंदाजपत्रकात नव्हता. तसेच निविदा अंदाजपत्रकीय दरापेक्षा १९.९८% जास्त दराने स्विकृत आहे. त्यामुळे मुळ रूपये १,३४,८२,०००/- रक्कमेपेक्षा जास्त खर्च होणार आहे, त्याचे विवरण खालील प्रमाणे.

| | | | |
|---|---|---|---|
| ०१. | मुळ अंदाजपत्रकीय रक्कम रूपये | :- | १,३४,८२,०००/- |
| ०२. | स्विकृत निविदेनुसार १९.९८% जास्त | :- | २६,९३,७०३/- |
| ०३. | सार्वजनिक बांधकाम खात्याकडे जमा करावयाची रक्कम | :- | ३,६१,०००/- |
| | **एकूण** | **:-** | **१,६५,३६,७०३/-** |

सदरील अपेक्षित खर्च हा मुळ मान्य खर्चाच्या रक्कमेपेक्षा १०% पेक्षा जास्त असल्यामूळे यासाठी सुधारीत प्रशासकीय मान्यता घेण्याचे निर्देश मा.आयुक्त यांनी दिले असून, सुधारीत प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेपूढे ठेवण्याची शिफारस केली आहे.

करीता उपरोक्त रूपये १,६५,३६,७०३/- रक्कमेस सुधारीत प्रशासकीय मान्यता मिळणेस्तव प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव प्रस्ताव सादर.

श्री.अ.रशिद खॉन :या प्रस्तावास स्थायी समितीने मंजूरी दिलेली आहे का दिली असेल तर प्रस्ताव येण्यास उशीर का झालेला आहे खुलासा देण्यात यावा.

कार्य.अभियंता(पापू) :या प्रस्तावास स्थायी समितीने मंजूरी दिलेली असून एकूण रक्कमेच्या १० टक्के रक्कम जास्त होत आहे त्यासाठी मान्यतेस प्रस्ताव ठेवलेला आहे.

श्री.अ.रशिद खॉन :ठराव ठेवतांना संपूर्ण माहिती सह ठेवला पाहिजे यानंतर दक्षता घेण्यात यावी अशी विनंती आहे.

मा.महापौर :प्रस्तावास मान्यता देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद पाणी पुरवठा योजनेवरील मुख्य जलवाहिनीवरील पाणी ग्राहंकाकरीता जलशुध्दीकरण केंद्र फारोळा ते अलाना कंपनी पर्यंत डी.आय.के.९ पाईपमध्ये सर्व उपांगासह उध्दरण नलिका टाकणेच्या सुधारीत र.रूपये १,६५,३६,७०३/- अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६९/१० :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, वरदगणेश ते सावरकर चौकापर्यंत रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणे, या कामाचे अंदाजपत्रक रू. २४,८९,२२१/- चे तयार करण्यात आले होते. यास मा.सर्वसाधारण सभा दि.४.१.२००५ नुसार मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार सदरील कामाची निविदा दि.२२.०१.२००५ रोजीच्या स्थायी समितीतील विषय क्र.२०३ नुसार उपरोक्त काम हे अंदाजपत्रकिय रक्कमेच्या ५% जास्त दराने मे.आदिनाथ कन्स्ट्रक्शन यांचेकडून करून घेण्यास मान्यता मिळालेली आहे.

सदरील अंदाजपत्रक तयार करतेवेळी असलेली रस्त्याची स्थिती व प्रत्यक्ष काम करीत असतांना झालेली रस्त्याची स्थिती यामध्ये बरीचशी तफावत झाल्यामूळे प्रत्यक्षात काम करीत असतांना रस्ता अत्यंत खराब झालेला होता. त्यामुळे अंदाजपत्रकातील केलेल्या तरतुदी व परिमाणमध्ये वाढ झाल्यामुळे अंदाजपत्रकीय रक्कम रू.२४,८९,२२१/- मध्ये काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% जास्तीने मंजूर असल्याने व प्रत्यक्षात काम करतेवेळी रू.६३,९५४/- वाढ होत असल्याने सुधारीत अंदाजपत्रकाची रक्कम रू.२८,०२,८६८/- होत आहे. यास मा.आयुक्त यांनी शिफारस केलेली आहे.

तरी कामाच्या मुळ अंदाजपत्रकास सक्षम सभेची किंवा सक्षम अधिकारी यांची प्रशासकीय मंजुरी प्राप्त झाल्यानंतर प्रत्यक्षात काम करतेवेळी काही अपरिहार्य कारणास्तव कामात वाढ होत असल्यास अशा कामांच्या बाबतीत सार्वजनिक बांधकाम संहितेच्या परिच्छेद क्र.१३४ नुसार प्रशासकीय मंजूरीपेक्षा १०% पेक्षा कमी वाढ होत असल्यास सुधारीत मंजूरीची आवश्यकता नसून ही वाढ १०% पेक्षा जास्त होत असल्यास त्यास सक्षम सभेची किंवा सक्षम अधिकारी यांची सुधारीत मंजूरी प्राप्त करण्याची आवश्यकता आहे.

तरी अशा प्रकारचे धोरण निश्चित करणेस्तव व उपरोक्त सुधारीत अंदाजपत्रक रू.२८,०२,८६८/- यास मंजूरी मिळणेस्तव विचारार्थ सादर.

**संवाद :**

श्री.अ.रशिद खॉन : या ठरावा बाबत सविस्तर खुलासा करावा.

अति.शहर अभियंता : मुळ अंदाज पत्रक हे रूपये २४,८९,२२१/-होते. त्यास सर्वसाधारण सभेची यापूर्वी मंजूरी घेतलेली आहे. निविदा काढतांना ५ टक्के जास्त दर भरून आले त्यास स्थायी समितीची मान्यता घेवून काम करण्यात आले . व आणखी काम करीत असतांना ७ टक्के वाढ झालेली आहे. एकूण १२ टक्के वाढ झालेली आहे. १० टक्केचे वर जी वाढ झालेली आहे ती ६३,०००/-रू.ची असून १० टक्के पर्यत खर्च करण्याची अनुमती असते.त्यापेक्षा जास्त रक्कम होत असेल तर सुधारीत मान्यता घ्यावी लागते.

मा.महापौर :प्रस्ताव मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वरदगणेश ते सावरकर चौकापर्यंत रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणेच्या सुधारीत र.रू.२८,०२,८६८/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७०/११ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, डॉ.डी.एस.देशपांडे हे औरंगाबाद महानगरपालिकेत आरोग्य वैद्यकीय अधिकारी या पदावर दि. १४.१२.८३ ते ३१.७.२००२ पर्यत कार्यरत होते. दि. ३१.७.२००२ रोजी ते नियत वयोमानानुसार , औरंगाबाद महानगरपालिकेतून सेवानिवृत्त झालेले आहेत.

मुख्य लेखापरिक्षक ,महानगरपालिका औरंगाबाद यांनी त्यांचेकडील गोपनिय पत्र जा.क्र.मनपा/ मुलेअ / ५१ / २००२ दि. ११.२.२००२ नुसार ,सन२०००-०१ व २००१-०२ या कालावधीतील आरोग्य विभागातील औषध खरेदी संबंधी लेखा परिक्षण करून त्या बाबतचा अहवाल मा.सभापती स्थायी

समिती यांना सादर केलेला होता.मा.सभापती स्थायी समिती यांनी त्यांचे दि.२७.२.२००२ च्या पत्रासोबत उक्त अहवालाची प्रत पुढील प्रशासकीय कार्यवाही साठी पाठविलेली होती.प्राप्त लेखा परिक्षण अहवालाच्या अनुषंगाने डॉ.देशपांडे यांचा खुलासा मागविण्यात आला असता तो त्यांनी दि. ५.३.२००२ रोजी सादर केलेला होता.प्राप्त खुलाशाच्या अनुषंगानेही मुख्य लेखा परिक्षक महानगरपालिका औरंगबाद यांनी दि.८.३.२००२ रोजी अहवाल सादर केलेला होता.याच संदर्भाने दि.१८.३.२००२ च्या स्थायी समिती सभेमध्येही आरोग्य विभागातील औषधी खरेदी संबधांने ,मुख्य लेखा परिक्षकांनी सादर केलेल्या लेखापरिक्षण अहवालावर विचार विनीमय होवून त्या बाबत प्रशासनाने आवश्यक ती कार्यवाही करावी असाही दि.१८.३.२००२ च्या स्थायी समिती सभेमध्ये निर्णय झालेला होता.

सदर लेखा परिक्षण अहवालात नमुद करण्यात आल्याप्रमाणे ,औषधी /वैद्यकिय उपकरणे/ साहित्य इत्यादी खरेदीतील अनियमितते संदर्भाने ,डॉ.डी. एस. देशपांडे, तत्कालीन आरोग्य वैद्यकिय अधिकारी यांची म.ना.से.(शिस्त व अपील)१९७९ चे नियम ८ अन्वये खाते चौकशी आदेशित करण्यात आलेली होती. जा.क्र.मनपा/आस्था-१/२००२/१४४९ नुसार दि.१३.६.२००२ रोजी, डॉ.डी.एस.देशपांडे यांना खाते चौकशी प्रकरणी दोषारोप पत्र देण्यात आलेले होते. तसेच त्यांच्यावर लागू केलेल्या दोषारोपांची चौकशी करण्याकरिता,चौकशी अधिकारी म्हणून,श्री.एस.एस.निरखी सेवानिवृत्त न्यायधिश यांची कार्यालयीन आदेश जा.क्र.मनपा/आस्था-१/ २००२/१४५० दि. १३.६.२००२ नुसार नियुक्ती करण्यात आलेली होती.

त्यानुसार श्री.एस.एस.निरखी,चौकशी अधिकारी तथा सेवानिवृत्त जिल्हा व सत्र न्यायाधिश यांनी सदर प्रकरणी, विधीवत चौकशी पूर्ण करून,चौकशी अहवाल दि.२२.३.२००४ रोजी सादर केला आहे . प्राप्त चौकशी अहवालानुसार ,एकंदरीत डॉ.डी.एस.देशपांडे सेवानिवृत्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी हे हे दोषी असल्याचे सिध्द झाले आहे, असा चौकशी अधिकारी यांचा स्पष्ट निष्कर्ष आहे .

चौकशी अधिकारी यांनी एकूण सर्व पुराव्यांचा सांगोपांग विचार करून सादर केलेल्या चौकशी अहवालातील निष्कर्षानुसार, डॉ डी.एस.देशपांडे यांनी विभाग प्रमुख म्हणून करावयाच्या कर्तव्यात अक्षम्य असे दुर्लक्ष केलेले होते . व औषधी ,उपकरणे व साहित्य खरेदी करतानां नियमांचे उघड उघड पायमल्ली केलेली होती, ज्याची संपूर्ण जवाबदारी विभाग प्रमुख म्हणून डॉ.देशपांडे यांची होती. व त्यामुळे महानगरपालिकेचे एकूण रू.१०,५५,३२३.०० चे आर्थिक नुकसान झाल्याबद्दल व त्यांनी महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक)नियम ३(१)(३) चा भंग केला असल्या बद्दल चौकशी अधिकारी यांचा निष्कर्ष होकारार्थी आहे. सोबत ,चौकशी अधिकारी यांनी सादर केलेल्या चौकशी अहवालाची छायांकीत प्रत जोडण्यात आलेली आहे.

चौकशी अधिकारी यांनी सादर केलेला चौकशी अहवाल विचारात घेता व त्यातील निष्कर्षाची छाननी करता डॉ.देशपांडे हे त्यांचे आरोपावरील चौकशी मध्ये दोषी असल्याचे सिध्द झाल्याने त्यांना, जा.क्र.मनपा/आस्था-१/२००४/६७४ दि. ५.५.२००४ नुसार '**कारणे दाखवा** 'नोटीस देवून विचारणा करण्यात आलेली होती की, महानगरपालिकेच्या आर्थिक नुकसानीची रक्कम रू.१०,५५,३२३.०० या रक्कमेपोटी ,त्यांना देय असलेली उपदानाची रक्कम रू. २,५०,०००.०० ही, महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ चे नियम २७(१) नुसार कायम स्वरूपी का थांबविण्यात येवू नये व उर्वरीत रक्कम रू.८.०५.३२३.००ही रक्कम त्यांचे कडून,त्यांना देय असलेल्या मासिक निवृत्ती वेतनाच्या रक्कमेतून रू.९.१८२.००प्रति महा प्रमाणे का वसूल करण्यात येवू नये, या बाबत लेखी स्पष्टीकरण सादर करण्यासाठीही त्यांना कळविण्यात आलेले होते.

त्या उत्तरी,डॉ.डी.एस.देशपांडे,सेवानिवृत्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी दि. १७.५.२००४ रोजी त्यांचे लेखी स्पष्टीकरण सादर केलेले आहे. तथापी त्यांनी सादर केलेले स्पष्टीकरण हे समर्थनिय नाही,पटण्यासारखे नाही तसेच विचारात घेण्यासारखे नाही कारण त्यास कायदेशीर आधार नाही व चौकशी अधिकारी यांनी,चौकशी अहवालात त्यांचा युक्तीवाद पूर्वीच फ़ेटाळून लावलेला आहे.

करिता, डॉ.डी.एस.देशपांडे,यांच्या विरूध्द आदेशित करण्यात आलेल्या खाते चौकशी मध्ये ते दोषी असल्याचे सिध्द झालेले असल्यामुळे,व महानगरपालिकेचे र.रू.१०,५५,३२३.००(रक्कम रू.दहा लाख पंचावन्न हजार तीनशे तेवीस फक्त) इतक्या रकमेचे नुकसान झाले असल्याचेही सिध्द झाले असल्यामूळे, व ही गंभीर वर्तणूक असल्यामूळे महानगरपालिकेच्या झाालेल्या सदरील आर्थिक हानीची रक्कम पूर्णत: मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६(२)(इ) नुसार व म.ना.से. (शिस्त व अपिल) नियम १९७९ चे नियम ५ (१) (३) अन्वये र.रू.१०,५५,३२३.०० चा भरणा करण्यासाठी

डॉ.डी.एस.देशपांडे यांना जा.क्र.मनपा/अस्था-१/२००४/११०७,दिनांक २७.०७. २००४ च्या कार्यालयीन आदेशान्वये कळविण्यात आलेले होते. सात दिवसात भरणा न केल्यास उक्त रक्कमेची वसूली प्रचलित नियमांच्या तरतुदीनुसार करण्यांत येईल. याची नोंद घेण्यासाठीही त्यांना कळविण्यात आलेले होते.

दरम्यान डॉ.देशपांडे यांनी त्यांची तात्पुर्ती निवृत्ती वेतन, अर्जित रजेचे रोखीकरण, भविष्य निर्वाह निधीची रक्कम व सेवा निवृत्तीचे इतर फायदे देय करण्यासाठी विनंती करणारी याचिका क्र.२४४९/०३ ही महानगरपालिके विरूध्द मा.उच्च न्यायालय,खंडपीठ औरंगाबाद येथे दाखल केलेली होती.तथापि चौकशी पूर्ण करून आदेश पारीत केलेले असल्यामूळे दिनांक २९.०७.२००४ रोजी मा.उच्च न्यायालयाने सदरील याचिका निकाली काढलेली आहे. डॉ.देशपांडे यांनी कार्यालयातर्फे पारीत केलेल्या २७.०७.२००४ च्या आदेशास स्थगिती देण्यासाठी मा.उच्च न्यायालयास विनंती केली होती. परंतु मा.उच्च न्यायालयाने स्थगितीस नकार देवून डॉ.देशपांडे यांना ॲपिलेट ॲथॉरिटी समोर अपील दाखल करता येईल व त्या संबंधी गुणवत्तेवर विचार करता येईल, असे नमुद करून त्यांची याचिका निकाली काढलेली आहे.

डॉ.देशपांडे यांना देण्यांत आलेल्या दिनांक २७.०७.२००४ च्या कार्यालयीन आदेशाच्या अनुषंगाने त्यांनी आदेशाच्या तारखेपासून सात दिवसाच्या आत रक्कम रूपये १०,५५,३२३.०० चा भरणा केलेला नाही. परंतु उक्त आदेश रद्द करणे/त्याची अंमलबजावणीस स्थगिती देण्यासंबंधी मा.स्थायी समिती, महानगरपालिका औरंगाबाद यांचे न्यायालयात दि.९.८.२००४ रोजी अपील दाखल केलेले होते. त्यांचे अपीलाच्या संदर्भाने मुद्दे निहाय स्वयंस्पष्ट अभिप्राय पाठविण्यासाठी मा.सभापती,स्थायी समिती यांनी प्रशासनास दिनांक १०.०८.२००४ रोजी दिलेल्या पत्राच्या अनुषंगाने मा.सभापती, यांना प्रकरणी मुद्देनिहाय अभिप्राय पाठविण्यात आलेले असून, डॉ.देशपांडे यांचेकडून रक्कम रू.१०,५५,३२३.०० वसूल करणे बाबत मंजुरी होणेस्तव स्वतंत्र प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीसाठी ठेवण्यात येत असल्याचेही, मा.सभापती,स्थायी समिती यांना कळविण्यांत आलेले आहे.

करिता डॉ.डि.एस.देशपांडे,तत्कालीन आरोग्य वैद्यकीय अधिकारी (सद्या सेवा निवृत्त) यांच्या विरूध्द आदेशीत करण्यात आलेल्या खाते चौकशीमध्ये ते दोषी असल्याचे सिध्द झालेले असल्यामुळे, महानगरपालिकेच्या आर्थिक नुकसानीची रक्कम रू.१०,५५,३२३.०० भरणा करण्यासाठी त्यांना आदेशित करूनही त्यांनी उक्त रक्कमेचा भरणा न केल्यामुळे उक्त रक्कम त्यांना देय असलेल्या उपदानाची रक्कम रूपये २,५०,०००.०० ही म.ना.से. (निवृत्ती वेतन) नियम १९८२ चे नियम २७ (१) नुसार व महानगरपालिका पेन्शन विनियम १६ नुसार कायमस्वरूपी थांबवून व उर्वरित रक्कम रू. ८,०५,३२३.०० ही रक्कम मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ (२) (इ) अन्वये डॉ.देशपांडे यांना देय असलेल्या मासिक निवृत्ती वेतनाच्या रक्कमेतून रू.९,१८२.०० प्रती महा प्रमाणे वसूल करण्या बाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर मान्यतेस्तव सादर करण्यांत येत आहे.

टिप :- चौकशी अहवाल सोबत जोडण्यांत आला आहे.

**<u>संवाद :</u>**

श्री.जागीरदार अजीज :या ठरावाचे जनक डॉ. आशा उत्तम बिनवडे आहे.या औषधी घोटाळा प्रकरणा संदर्भात गेल्या ५ वर्षापासून पाठलाग करीत आहे म्हणून मी त्यांचा अभिनंदनाचा ठराव या सभागृहात ठैवत आहे त्यास मान्यता दयावी अशी विनंती करतो.

श्री.देसरडा प्रशांत :या ठरावास अनुमोदन आहे.

डॉ.आशा बिनवडे : आजच्या विषयपत्रिकेवर प्रशासनाकडून आरोग्य विभागात झालेल्या औषधी व साहित्य खरेदी घोटाळ्याशी संबंधीत प्रस्ताव आलेला आहे. हा प्रस्ताव पाहिल्यानंतर साधारणत: असा समज होतो की, सन २००० ते २००२ या दोन वर्षाकरिता झालेल्या औषधी, साहित्य व उपकरणे यांच्या खरेदीत महापालिकेचे १० लाख ५५ हजार रूपयांचे नुकसान तत्कालीन आरोग्य वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे झाले होते. करीता १० लाख ५५ हजार रूपये संबंधित अधिकाऱ्यांच्या निवृत्ती वेतनातून दरमहा ९ हजार रूपये याप्रमाणे १० वर्षात वसूल करण्याचा प्रस्ताव प्रशासनाने या सभागृहासमोर आणन्याचं फार मोठं काम केलेले आहे. परंतु प्रत्यक्षात तत्कालीन वैद्यकीय अधिकारी यांना कमीत कमी त्रास होईल, याची अधिक काळजी प्रशासनाने घेतल्याचे या प्रस्तावात निदर्शनास येते. इतकेच नव्हे तर औषध खरेदी घोटाळ्यामध्ये डॉक्टरांना प्रत्यक्ष-

अप्रत्यक्ष सहाय्य करणाऱ्या व्यक्तींना, वर्षानुवर्षे बोगस, निकृष्ट दर्जाची औषधी देवून महापालिकेस लुटणाऱ्या सर्व औषधी कंपन्यांना अभय देण्याचे काम प्रशासन करीत आहे.

शहरातील गोरगरीब जनतेच्या जीवनाशी संबंधीत असलेल्या या औषधी खरेदी प्रकरणावर सविस्तर बोलण्याची परवानगी महापौर साहेब आपण मला द्यावी अशी माझी विनंती आहे.

या शहरातील गरीब व शारीरीक आजाराने, दुखाःने पीडीत जनता महापालिकेच्या आरोग्य केंद्रावर औषधोपचार मिळविण्यासाठी येत होती व येत असते. आणि या गरीब रूग्णांच्या जीवनाशीच नव्हे तर जीवाशी खेळण्याचा क्रुरपणा सतत ३२ वर्षे महापालिकेच्या सेवेत असतांना तत्कालीन वैद्यकीय अधिकारी डॉ.डी.एस.देशपांडे यांनी केलेला आहे. माझी सभागृहातील सर्व सहकारी सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, या शहराच्या जनतेने आपल्या सर्वांना अत्यंत विश्वासाने अन्यायाला वाचा फोडण्यासाठी, जनतेला न्याय मिळवून देण्यासाठी, जनतेचे प्रतिनिधी म्हणून या सभागृहात पाठविलेले आहे. त्या विश्वासाची परिक्षा आज आम्हाला इथं द्यायची आहे. या शहराच्या जनतेला न्याय मिळवून द्यायचा आहे. म्हणून फार विचारपूर्वक या प्रस्तावावर निर्णय घ्यायचा आहे व महापौर साहेब आपल्याकडून जनतेला न्यायाची अपेक्षा आहे.

आणि म्हणून आधी हे प्रकरण काय आहे, ते सविस्तर समजून घेणं आवश्यक आहे. या प्रकरणाची सुरूवात कशी झाली हे मला आपल्या सर्वांच्या निदर्शनास आणून द्यायचे आहे.

साधारणतः चार वर्षापूर्वी ११ सप्टेंबर २००१ रोजी मी, स्थायी समितीत असतांना आरोग्य विभागाकडून औषधी, साहित्य व उपकरणे खरेदी करण्याकरीता अंतिम मंजुरीकरीता निविदेचा प्रस्ताव सभागृहासमोर आला होता.

(नेमका ११ सप्टेंबर २००१ रोजी अमेरीकेत वर्ल्ड ट्रेड सेंटरवर अतिरेकी हल्ला झाला, म्हणून ती तारीख माझ्या अधिक लक्षात आहे व योगायोगाने हा आर्थिक घोटाळा करणारे तत्कालीन वैद्यकीय अधिकारी डॉ.देशपांडे आज तिकडे अमेरिकेत वास्तव्य करून आहेत.)

त्या प्रस्तावात ५३८ आयटमस् केंकरे ब्रदर्स, मुंबई यांचेकडून खरेदीसाठी मंजुरी द्यावयाची होती.

तो प्रस्ताव पाहिल्यानंतर मला आश्चर्याचा धक्का बसला.

त्या प्रस्तावात केंकरे ब्रदर्स या एकाच कंपनीकडून ज्या ५३८ ॲटमस् खरेदी करण्याचा प्रस्ताव होता, त्यात नुसती औषधी व साहित्य, वैद्यकीय उपकरणेच नव्हे तर फर्निचर, टेबल, खुर्च्या,पडदे,स्टील कपाट, रेफ्रिजरेटर इत्यादी सर्वच बाबी एकाच कंपनीकडून एकाच निविदेद्वारे खरेदी करावयाच्या होत्या. ती औषध विक्रेती कंपनी होती की, सर्व काही विकणारे मॉल होते, कळण्यास मार्ग नाही व ती निविदा तर निविदा नव्हे केवळ दरपत्रक होते.

दुसरी ठळक गोष्ट अशी लक्षात आली की, इमर्जन्सी लागणारी औषधी व मशिनरी कोणत्याही आरोग्य केंद्रात वापरली जात नव्हती. कारण इमर्जन्सी रूग्ण आम्ही घेतच नव्हतो. आरोग्य केंद्रात कुठलीही मोठी शस्त्रक्रिया होत नव्हती. कारण मोठे शस्त्रक्रियागार महापालिकेच्या आरोग्य केंद्रात कूठेही नव्हते. तरी सुध्दा मोठ्या प्रमाणात इमर्जन्सी औषधी व मोठमोठी यंत्रे शस्त्रक्रियेकरीता खरेदी करण्याचा प्रस्ताव होता.

५७२ ॲटमस् पैकी फक्त ५० ॲटमस् समोर कोणत्या कंपनीची आहेत, त्यांची नांवे होती. म्हणजे उर्वरीत गोष्टी बॉम्बे मार्केटच्या निकृष्ट दर्जाच्या असण्याची शक्यता होती. किंवा त्या फक्त कागदोपत्रीच खरेदी करण्याचा मानस असावा.

जवळपास सर्वच औषधीच्या किमंती बाजार भावापेक्षा खूप अधिक होत्या. एकूण ३५ लाखांची औषधी व २५ लाखांची साहित्य, उपकरणे अशी एकूण ६० लाखांची खरेदी करण्याचा तो प्रस्ताव होता. अनावश्यक, ज्याचा उपयोग आम्ही करत नाही अशा व निकृष्ट दर्जाच्या औषधी व साहित्याची खरेदी जी प्रत्यक्षात ३०-३५ लाखात होवू शकते तेच आम्ही ६० लाख रूपये देवून निविदेद्वारे खरेदी करणार होतो. महापालिकेला २५ लाखाचा आर्थिक फटका एका दिवसात होणार होता.

मी,त्या सभागृहात ही गोष्ट सभागृहाच्या लक्षात आणून दिली नसती तर जनतेच्या जीवरक्षणाकरीता ही खरेदी करणे आवश्यक आहे असे सभागृहाला भासवून खरेदी झाली असती. ती निविदा स्थायी समितीने रद्द केली. परंतु या प्रसंगातून तत्कालीन वैद्यकीय अधिकाऱ्यांची चालाखी लक्षात आली व आरोग्य विभागात चालणाऱ्या कारभाराची व आर्थिक घोटाळ्याचा अंदाज आला. मग मी या विभागातर्फे कशा पध्दतीने खरेदी केली जाते याची माहिती घेणे सुरू केले.

शेवटची निविदा १९९८-१९९९ साली निघाली असल्याची माहिती मिळाली व तेंव्हापासून फक्त दरपत्रके मागवून त्याच कंपन्याकडून वर्षानुवर्षे निविदा न काढता खरेदी करणे चालू असल्याचे लक्षात आले.

मी वैद्यकीय अधिकाऱ्यांना दिनांक १९ सप्टेबंर २००१ व २५ ऑक्टोबर २००१ रोजी सन २००० ते २००२ या दोन आर्थिक वर्षाकरीता वर्षभरात झालेल्या तात्पुरत्या खरेदीचा लेखी खूलासा मागितला. ज्याचे उत्तर देण्यास बरीच टाळाटाळ करून शेवटी दोन महिन्यांनी २२ नोव्हेंबर २००१ रोजी वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्या एक वर्षातील केलेल्या एकूण ३० लाखाच्या खरेदीची लेखी माहिती दिली.

३० लाखाच्या केलेल्या औषध व साहित्याच्या खरेदीची यादी जेंव्हा मी पाहिली तेंव्हा त्या खरेदीची अवस्था रद्द झालेल्या टेंडरपेक्षा वेगळी नसून धक्कादयकच होती.

१. त्यात केंकरे ब्रदर्स यांचेकडून १०१ प्रकारची औषधी व साहित्य खरेदी केले होते. त्यातील फक्त १७ औषधांच्या कंपनीची नावे नमूद होती. ८४ अॅटमस् बोगस कंपनीची व निकृष्ट दर्जाचीच खरेदी केली होती. या १७ औषधी सुध्दा एम.आर.पी. पेक्षा जास्त किमंतीने खरेदी केलेली होती. शस्त्रक्रियेसाठी न लागणारे साहित्य मोठ्या प्रमाणात खरेदी केले होते.

२. दुसरी एक गोव्याची कंपनी टी.व्ही.एम.फार्मास्युटीकल्स् म्हापसा या कंपनीच्या Tiviflem नावाच्या वेदनाशामक गोळ्या जीवरक्षक गोळ्यांच्या नावाखाली इतर स्टँडर्ड कंपनीच्या त्याच गुणधर्माच्या गोळ्यांपेक्षा तीनपट किमंतीने आवश्यकता नसतांना ५ लाख गोळ्यांची ९ ते १० लाख रूपये खर्चून या गोव्याच्या कंपनीकडून खरेदी केली होती.

स्थायी समितीचे तत्कालीन सभापती सन्माननीय प्रशांत देसरडा यांनी ३० जानेवारी २००२ ला यावर सविस्तर चर्चा करून मुख्यलेखा परिक्षकांना २००० ते २००२ या दोन आर्थिक वर्षातील खरेदीचे लेखा परिक्षण करण्याचे आदेश दिले. या दोन वर्षाचे चाचणी लेखा परिक्षण करण्यांत आले. ज्याचा अहवाल ११ फेब्रुवारी २००२ ला प्राप्त झाला.

त्या अहवालाचा एकूण निष्कर्ष असा होता की, या दोन वर्षातील तात्पुरत्या खरेदीत ३० लाखांच्या खरेदीत १२ लाखाचे आर्थिक नुकसान महापालिकेचे झाले आहे.

शासन दर करार, शासकीय खरेदीचे नियम न पाळता निविदा खरेदीचे सर्व नियम धाब्यावर बसवून खरेदी झाली. शासनाचे नियम महापालिकेस बंधनकारक नाहीत व महापालिकेची स्वतंत्र अशी नियमावली किंवा खरेदी संहिता नाही. याचा

गैरफायदा उचलत (अत्यंत चुकीच्या) मन मानेल तशी औषधी कंपन्यांशी संगनमन करून खरेदी करण्याचे धाडस डॉ.देशपांडे यांनी केलेले होते.

वर्षानुवर्षे लाखो रूपयांची खरेदी त्याच ठराविक कंपन्यांकडून केली गेली असल्याचे निदर्शनास आले. चाचणी परिक्षा अहवालावर दि.१८ मार्च २००२ रोजी स्थायी समितीच्या सभागृहात जोरदार चर्चा झाली व तत्कालीन सभापती मा.प्रशांतजी देसरडा यांनी या औषधी खरेदी प्रकरणी तज्ञ व्यक्तींची चौकशी समिती नेमून चौकशी करण्यात यावी व दोषींवर गुन्हे दाखल करण्यात यावेत असे प्रशासनास आदेश दिले.

प्रशासनातर्फे १३ जून २००२ रोजी निवृत्त न्यायाधीश श्री.निरखी यांची या कामी चौकशी अधिकारी म्हणून नेमणूक केली व १३ जून रोजी चौकशी सुरू झाली. परंतु तब्बल दिड वर्ष संबंधीत वैद्यकीय अधिकाऱ्यांना चौकशी समितीसमोर हजर राहण्यासाठीची साधी नोटीस प्रशासन बजावू शकले नाही. शेवटी मा.उच्च न्यायालयाचे आदेशानुसार फेब्रुवारी २००४ मध्ये चौकशी समितीचे काम खऱ्या अर्थाने सुरू झाले. मी स्वत:हून समितीसमोर प्रशासनाची साक्षीदार झाले. एक महिन्यात चौकशी पूर्ण झाली व २० मार्च २००४ ला चौकशी अहवाल प्राप्त झाला.

तब्बल दीड वर्षानंतर हा प्रस्ताव आज सभागृहात प्रशासनातर्फे सादर करण्यात आला. चौकशी समितीचा अहवाल संपूर्ण सभागृहाने वाचला असेलच. यात विभाग प्रमुख म्हणून तत्कालीन वैद्यकीय अधिकारी पूर्णत: दोषी असल्याचे व औषध खरेदीत बराच घोटाळा झाला असल्याचा स्पष्ट निष्कर्ष समितीने दिला आहे.

समितीच्या अहवालातील शेवटच्या २८ नंबरच्या परिच्छेदाचे अवलोकन करून मी सभागृहाचे लक्ष वेधू इच्छिते.

परिच्छेद क्र.२८ : एकूण सर्व पुराव्यांचा सांगोपांग विचार केल्यास डॉ.दिनकरराव देशपांडे यांनी आरोग्य विभाग, महापालिका यांचे विभाग प्रमुख म्हणून करावयाच्या कर्तव्यात अक्षम्य असे दुर्लक्ष केले आहे व औषधी, उपकरणे व साहित्य खरेदी करतांना नियमांची उघड उघड पायमल्ली केली आहे. त्यामुळे अधिकारी म्हणून त्यांचे सर्व वर्तन हे शंकास्पद ठरते. त्यांनी फौजदारी स्वरूपाचा गुन्हा केला आहे किंवा नाही हे पाहण्याचा अधिकार चौकशी अधिकारी म्हणून मला नाही. परंतु एक गोष्ट निश्चित की, या सर्व खरेदीत बराच आर्थिक घोटाळा झाला आहे व त्याची संपूर्ण जबाबदारी डॉ.दिनकरराव देशपांडे यांची आरोग्य विभाग प्रमुख म्हणून आहे व ही जबाबदारी त्यांना झटकता येणार नाही. त्यामुळे वाद विषय क्रमांक २ व ३ यावर माझा निष्कर्ष होकारार्थी आहे.

यातच सर्व काही आले. चौकशी अधिकाऱ्यांनी अप्रत्यक्ष पण स्पष्टपणे सूचविले आहे की, ''त्यांनी फौजदारी स्वरूपाचा गुन्हा केला आहे किंवा नाही हे पाहण्याचा अधिकार चौकशी अधिकारी म्हणून मला नाही.'' परंतु तो महानगरपालिका प्रशासनास व या सभागृहास नक्कीच आहे.

वर्षानुवर्षे या शहराच्या जनतेला दु:खित,पीडीत गरीब जनतेला कुठल्याही आरोग्य सेवा न देता योग्य तो औषधोपचार न देता लाखो रूपयांची उधळपट्टी करून काही कंपन्यांबरोबर संगणमत करून भरपूर मलिदा खाण्याचे काम झाले आहे. प्रचंड माया गोळा करून तत्कालीन वैद्यकीय अधिकारी सध्या अमेरिकेत आराम करत आहेत व इकडे महापालिका प्रशासन १ वर्षात झालेल्या १० लाख आर्थिक नुकसानीची भरपाई तीही हप्त्याहप्त्याने महिना ९ हजार डॉ.देशपांडेच्या निवृत्ती वेतनातून वसूल करण्यात धन्यता मानत आहे.

संबंधित डॉ.देशपांडेना तशीही भारतातल्या फक्त ९ हजार निवृत्ती वेतनाची गरज नाही.

महापालिकेचे फक्त १० लाख रूपयांचे झालेले आर्थिक नुकसान जे समोर आले आहे ते तर फक्त एक पाण्यावर तरंगणाऱ्या हिमनगाचे टोक आहे. पाण्याच्या पृष्ठभागाखाली असणारा भाग प्रचंड मोठा आहे. ज्याची अजून कसलीही दखल घेतली नाही किंवा चौकशी झाली नाही.

या चौकशीच्या निमित्ताने झालेले लेखा परिक्षण हे चाचणी लेखा परिक्षण होते. सविस्तर लेखा परिक्षण होणे आवश्यक आहे. ३० लक्षच्या औषधी खरेदीत १० लक्षचा घोटाळा होतो तर ३२ वर्षाच्या सेवेत किती झाला असेल.

जे झाले आहे, त्याकरीता अत्यंत कठोर कार्यवाही दोषीवर होणे आवश्यक आहे व अशा प्रकारचे घोटाळे होवू नये म्हणून त्यावर प्रतिबंध घालून आरोग्य विभागाचा कारभार स्वच्छ व स्पष्ट व्हावा याकरीता ठोस निर्णय घेणं ही आजची गरज आहे. माझी महापौर साहेब आपणांस व सभागृहास नम्र विनंती आहे की, आपण आज निर्णय घ्यावा की, १० लक्ष एकदम वसूल करावे.

२. संबंधीत प्रकरणात पूर्णत: दोषी असणाऱ्या आणि ३२ वर्षे संपूर्ण प्रशासनास व महापालिकेस अंधारात ठेवणाऱ्या तत्कालीन वैद्यकीय अधिकारी डॉ.देशपांडे व त्यांना सहाय्य करणाऱ्या सर्व प्रवृत्ती/व्यक्तींवर फौजदारी गुन्हे दाखल करून प्रकरणाचा तपास सी.आय.डी.मार्फत करण्यात यावा.

३. संगणमताने आर्थिक गैरव्यवहार करणाऱ्या व महापालिकेला लुटणाऱ्या कंपन्या मे.केंकरे ब्रदर्स,मुंबई, मे.टी.व्ही.एम.फार्मास्युटीकल्स,गोवा, मे.प्रिमियम असोसिएटस्,नागपुर यांचेवर त्वरीत फौजदारी गुन्हे दाखल करावेत. औषधी ही आवश्यक वस्तु या सदराखाली येत असल्यामूळे Essential Commodity Act 1955 व Drugs Prices Control Order 1995 च्या अंतर्गत औषधी एमआरपी पेक्षा जास्त भावाने विकल्याबद्दल संबंधीत कंपन्यांवर गुन्हे दाखल करावेत.
(गेल्या दिड वर्षात या सर्व गोष्टी प्रशासनाकडून होणे अपेक्षित होते.)

४. १९९५ ते २००२ या संपूर्ण सात वर्षाचे लेखा परिक्षण करावे.

५. ह्या सात वर्षाचे नुसते लेखा परिक्षण करून भागणार नाही तर या सात वर्षात झालेली खरेदी प्रत्यक्षात किती, कागदोपत्री किती, खरोखरच कोणती औषधी व साहित्य घेतले होते, कोणत्या कंपनीचे होते, स्टँडर्ड होते की, बॉम्बे मार्केटचे, त्याचा गुणात्मक दर्जा तपासण्या करून त्याचा उपयोग केला होता का? अनावश्यक मोठमोठ्या मशीनरीज, उपकरणे खरोखरीच खरेदी करून उपलब्ध केली होती का? रूग्णांना प्रत्यक्षात काय दिले? याचा सखोल अभ्यास करून चौकशी करण्याकरीता आयोगाची स्थापना करून त्यात वैद्यकीय क्षेत्रातील तज्ञ व्यक्तींची उदा.निवृत्त उपसंचालक आरोग्य सेवा अशा प्रकारच्या व्यक्तींची नेमणूक करून चौकशी करावी. दहा लाख रूपये संबंधित वैद्यकीय अधिकाऱ्याकडून एक रकमी वसूल करावेत अन्यथा त्यांची मालमत्ता जप्त करावी.

६. इथून पूढे असे घोटाळे होवू नये, म्हणून प्रतिबंधात्मक काही निर्णय घ्यावे. जसे -

१. आरोग्य विभागाच्या औषधी, साहित्य, उपकरणे यांच्या खरेदीवर नियंत्रण ठेवण्याकरीता व दर्जेदार साहित्य खरेदी केले जावे याकरीता एक निविदा समिती व दुसरी सल्ला व खरेदी समिती स्थापन करावी. त्यात वैद्यकीय क्षेत्रातील तज्ञ व्यक्तींचा समावेश असावा.

२. महापालिकेच्या आरोग्य विभागाकरीता स्वतंत्र खरेदी नियमावली व संहिता तयार करावी. खरेदी संहिता तयार करण्याकरीता आधी एक समिती नेमून ही संहिता तयार करावी. कारण यात वैद्यकीय क्षेत्रातील व त्याचवेळी प्रशासनातील अनुभव असणाऱ्या व्यक्तींची आवश्यकता आहे.

या सर्व बाबींचा विचार करून आजच्या प्रस्तावावर निर्णय द्यावा. फक्त १० लाख रूपये आर्थिक नुकसान भरून घेणे एवढेच अपेक्षित नसून या शहराच्या जनतेला खऱ्या अर्थाने न्याय मिळावा व या सभागृहात न्याय न मिळाल्यास

न्यायालयात जावून न्याय मिळविण्याची वेळ या शहराच्या जनतेवर येवू नये, अशा प्रकारचा निर्णय महापौर साहेब आपण घ्यावा, ही विनंती करते व माझे निवेदन संपवते.

श्री.मुजीब खॉन : हा अहवाल मी संपूर्ण वाचलेला आहे. यात डॉ. देशंपाडे याचे शिवाय इतर कुणाचेही नाव नाही. सर्वच महापालिकेचा कारभार डॉ. देशपांडे कडेच होता का असा प्रश्न पडतो या चौकशी अहवालात मा.आयुक्त, उपआयुक्त तसेच इतर अधिकाऱ्यांचा कोठेही समावेश नाही. ही चौकशी नसून हेतूपूरस्सर एका व्यक्तीवर सर्व चुका टाकून त्यांना दोषी ठरवायचे हे बरोबर नाही.कोणतीही चौकशी करण्यासाठी सेवानिवृत्त अधिकारी यांना केंव्हाही देवू नये. व्यक्ती निवृत्त होते, याचा अर्थ ते वयोवृध्द असतात शरीराने व मनाने निवृत्त होतात, ही चौकशी अशा अधिकाऱ्याकडे द्यावी की, या प्रकरणात जे जे कुणी असतील त्याची चौकशी झाली पाहिजे व समोर आले पाहिजे. ही चौकशी नसून एका निवृत्त अधिकाऱ्यांना टारगेट बनविण्याचा हा प्रयत्न आहे.

श्री.देसरडा प्रशांत : सेवा निवृत्त व्यक्तीचा स.सदस्य अपमान करीत आहे.

श्री.मुजीब खॉन :चौकशीमधे एकाच अधिकाऱ्याचे नाव आहे. अंदाजपत्रक तयार करणारे वेगळे अधिकारी असतांत,लेखा विभाग संबधीत आहे यात जे जे अधिकारी संबधीत आहे. अशा मोठया प्रकरणात एकच अधिकारी दोषी असू शकत नाही. व होणार ही नाही. ज्यांनी टेंडर पास केले बिल दिले ज्यानी त्या संचिकेला मान्यता दिली ते सर्व अधिकारी चौकशीमधे आले पाहिजे. त्या त्या वेळच्या अधिकाऱ्यावर कार्यवाही झाली पाहिजे.व त्या वेळी कोणकोणते अधिकारी होते याचाही खुलासा झाला पाीहजे.

श्री.देसरडा प्रशांत :सन २००२ मधे स्थायी समितीमधे औषधी खरेदीची निवीदा सादर झालेली होती. त्यावेळी स.सदस्या डॉ. बिनवडे हया सदस्य होत्या. औषधी खरोदी प्रकरणात चौकशी समिती नियुक्त करण्याचे आदेश करण्यात आले होते प्रशासनाने पूर्णपणे चौकशी समिती नियुक्तच केलेली नाही. एक सदस्यीय समिती नियुक्त केली समितीधे एक सेवानिवृत्त लेखाधिकारी असावे म्हणून सुचना केलेल्या होत्या .डॉ. देशपांडे यांचेच नाव कसे असा मुद्दा स.सदस्य यांनीमांडला परंतू आरोग्य विभाग हा स्वतंत्र विभाग असून डायरेक्ट मा.आयुक्तांच्या अंतर्गत येते. या विभागाची संचिका लेखा विभाग किंवा उपआयुक्तांमार्फत मा.आयुक्ताकडे जात नाही .म्हणून यात जे आयुक्त असतील त्यांची सुध्दा नावे यावयास पाहिजे. यापूर्वी जे ऑडीट करण्यात आले त्यात दोषी कुणीच नाही म्हणून ज्यांनी ऑडीट केले त्यांचेवरही कार्यवाही होणे अपेक्षीत आहे. एक सदस्यीय समिती जेंव्हा नियुक्त केली त्यात डॉ. कल्याणी याचा सुध्दा अभिप्राय आहे तो विसरता कामा नये. ज्या कपंनीने एम.आर.पी दरापेक्षा जास्त दराने महानगरपालिकेस औषधी पूरवली त्यांचेवर सुध्दा गुन्हे दाखल करावे म्हणून तशा सूचना मी सभापती या नात्याने दिलेल्या होत्या. परंतु प्रशासनाने कुठलीही दखल घेतलेली नाही म्हणून प्रशासनावर सुध्दा कार्यवाही होणे अपेक्षीत आहे. आरोग्य विभाग हा नागरीकांशी जोडलेला असतो. राज्य शासन किंवा केंद्र शासनाने जे काही नॉर्मस ठरविलेले आहे, त्यांचेकडून घेतले नाही. डॉ. देशपांडे यांनी त्या सूचनाची पायमल्ली केलेली आहे. १८ लक्षची औषधी महानगरपालिकेने खरेदी केलेली असून त्या कंपनीने इन्कम टॅक्स भरलेला आहे की नाही याची तपासणी झाली पाहिजे. ३० लक्ष मधे १० लक्ष भ्रष्टाचार उघडकीस येत असेल तर १८ कोटीच्या औषधी खरेदीमधे किमान ५ कोटीचा भ्रष्टाचार झालेला असेल असे वाटते. ज्या कंपन्यानी औषधी पुरविली त्या कंपन्यावर पोलीस गुन्हे दाखल करावेत अशी माझी मागणी आहे.

श्री.बारवाल गजानन : या अहवालात क्र ८ मधे औषधी खरेदीसाठी एक चौकशी नियुक्त करण्यात आलेली होती त्यात मा.आयुक्त , मुख्यलेखा परीक्षक , मुख्यलेखाधिकारी तसेच संबधीत आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांचा समावेश होता. व या समितीने संर्वागिण

विचार करून औषधी खरेदी केली जात होती असे नमूद केलेले आहे. यामधे असेही नमूद आहे की त्यामूळे महानगरपालिकेस आर्थिक फटका बसला हे म्हणणे बरोबर नाही असा स्पष्ट उल्लेख केलेला आहे. त्यापूढे असे की टिव्ही फ्लॅमच्या गोळयाचा वापर महानगरपालिकेतील दवाखान्यात मोठया प्रमाणात करावा लागतो व त्यामूळे या गोळयाचा स्टॉक जीव रक्षणाकरिता म्हणून केलेला आहे त्यात महानगरपालिकेचा निधी विनाकारण अडकून पडला नाही. क्र. १० स्पष्ट दिले की मुख्य्य लेखा परिक्षणकाच्या अहवालात जे रू. ५,२८,२३३/- चे आर्थिक नुकसान झाले हे काल्पनिक असल्याचे सिध्द होते जादा खर्चा बाबत तपशील हा ढोबळ मानाने तयार केला आहे वरील अनुमान कोणत्या आधारावर केले आहे याचा तपशील लेखा परिक्षणात नाही महानगरपालिकेने जाहीर निविदा काढतांना हे स्पष्ट केले की कुठल्याही औषधी व साहित्याच्या ब्रँडमध्ये बदली वस्तू घेण्यात येणार नाही रू. ४,७७,९००/- चा जादा खर्च हा चुकीच्या माहितीच्या आधारावर काढलेला आहे यात महानगरपालिकेचे कुठलेही आर्थिक नुकसान झालेले नाही असे लेखा परीक्षणाच्या अहवालात येते. एक कमेटी स्थापन करून औषधी खरेदी केलेल्या आहेत गरज होती म्हणून खरेदी केलेली आहे. स्थायी समितीने मान्यता दिली टेंडर काढण्यात आले . असे असतांना जर आरोप हे एकाच व्यक्तीवर होत असेल तर बरोबर नाही.कमेटीचे कोणतेही निकष समोर आलेले नाही. यात कुठेही दोष नाही असे लेखा परीक्षण अहवालत आहे. म्हणून कोणतीही दिशाभूल न होता लेखा परीक्षणाचा अहवाल बरोबर आहे असे समजून योग्य तो निर्णय घेण्यात यावा.

श्री.संजय केनेकर :लेखी अहवाल सादर केलेला आहे. हा जनतेचा पैसा आहे. या प्रकरणामधे एकच व्यक्ती जरी दोषी नसेल तर या संबधीचे काम कोण पाहत होते. त्याची चौकशी झाली पाहिजे.दिलेला रिपोर्ट अर्धवट आहे. संपूर्ण चौकशी झाली पाहिजे.

श्री.रेणूकादास वैद्य :एकाच व्यक्तीला टारगेट करून हा अहवाल सादर झालेला आहे. जी चौकशी झाली ती योग्य वाटत नाही.सक्षम अधिकाऱ्याच्या अध्यक्षतेखाली समिती नियुक्त करून व संपूर्ण चौकशी होवूनच कार्यवाही करावी. डॉ. देशपांडे यांनी स्थायी समितीला अपील केलेले होते. असे असतांना सुधदा पून्हा पून्हा असे ठराव का समोर येत आहे कळायला मार्ग नाही.हा ठराव स्थगित ठेवावा.

श्री.शंशाक विसपूते :तत्कालीन आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांचे काळात ५० ते ६० लक्षची औषधी खरेदी केली जात होते. परंतू ते गेल्यानंतर आता १० ते १५ लक्षची औषधी खरेदी होते चार पट कमी खर्च झालेला आहे याचा अर्थ कुठेतरी चूक झालेली आहे.

श्री.अजीज जागीरदार :डॉ. देशपांडे यांचेवर आरोपपत्र दाखल केले डॉ. देशपांडे यांनीही सर्व कार्यवाही केलेली आहे. दुसऱ्यांना आरोपी कशासाठी बनवित आहात. आरोपी हे डॉ. देशपांडेच होते तर दुसऱ्याची चौकशी करण्याचे अधिकार प्रशासनास नव्हते. त्याचे एकटयावर आरोप केलेले होते चौकशी झालेली आहे दोषी ठरविलेले आहे म्हणून कार्यवाही होणे अपेक्षीत आहे.व त्याचेकडून एकदम सर्व रक्कम वसुल करावी.

सौ.रजनी जोशी :पोटतिडकीने स.सदस्यांनी आपआपले मत व्यक्त केलेले आहे. भ्रष्टाचार होणे बरोबर नाही मग तो कोणताही व्यक्ती असो असे माझे मत आहे. या सर्व प्रकरणात एक व्यक्ती जबाबदार होवू शकतो का?या सर्व संचिकेवर आयुक्तांच्या सहया असतील चौकशी अहवालामधे आयुक्तांचे कुठेही नाव नाहीऔषधी कोठून घेतलेल्या आहे त्यांना दोषी ठरविलेले नाही. या संदर्भात योग्य ती चोकशी करून त्यानंतर निर्णय घेण्यात यावा.

श्री.मधुकर सावंत पान क्र २९ वर जो टराव दिं २७.१.२००५ रोजी चा ठराव मांडलेला आहे तो ठराव विषय पत्रिकेवर आलेला नव्हता हे मी खात्रीने सांगतो . मीही त्यावेळी स्थायी समितीचा सदस्य होतो.

मा.महापौर : त्या बैठकीत जे ठराव पास झाले त्या इतिवृत्तावर सचिव व सभापती यांची सही आहे. ज्या वेळेस इतिवृत्त कायम करण्यासाठी समोर येतो त्यावेळी आपण विरोध का केलेला नाही.

श्री.विनायक पांडे :माझ्या मते हा ठराव फक्त एका व्यक्तीचा पुर्वदुषित भावनेतून ठेवण्यात आलेला आहे. याची सक्षम अधिकारी नियुक्त करून संपूर्ण चौकशी करावी तोपर्यंत स्थगिती देण्यात यावी.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर :चौकशी समितीचा अहवाल आलेला आहे तो मान्य करायचा की नाही यावर निर्णय होणे अपेक्षीत आहे. रिपोर्टमधे संबधीत जे डॉ देशपांडे हे दोषी असल्याचे स्पषट म्हटले आहे.एक सदस्यी समिती होती त्या समितीने रिपोर्ट दिलेला आहे.यात भ्रष्टाचार आहे त्यास कुणी पांठिबा देत असेल तर बरोबर नाही. एका अधिकाऱ्याकडून १० लक्ष रूपये हे ९ वर्षात जमा करणार असाल तर यापूढे अनेक भ्रष्टाचार होतील.कायदयाप्रमाणे निर्णय घ्यावा. जे डॉ. देशपांडे याचे नाव दिलेले आहे ते दोषी असून त्याचेवर कार्यवाही झाली पाहिजे असे माझे मत आहे.

श्री.अ.रशिद खान :एकच अधिकारी दोषी असू शकत नाही. पून्हा चौकशी समिती नियुक्त करावी. जे दोषी निघतील त्यांचेवर कार्यवाही करण्यात यावी.हा प्रस्ताव स्थगित ठेवण्यात यावा.समितीमधे दोन चौकशी अधिकारी ठेवण्यात यावे.एकाच व्यक्तीला दोषी ठवून कार्यवाही करणे योग्य नाही.

श्री.संजय सिरसाट :आरोग्य विभागाचा चौकशीचा अहवाल आलेला असून निर्णय घ्यायचा आहे. स.सदस्या डॉ. आशा बिनवडे यांनी अनेक दिवसापासून या प्रकरणाच्या मागे होत्या आज सभागृहाने त्यांचे अभिनंदन व पाठींबा सुध्दा दिलेला आहे. चौकशी ही आरोग्य विभागामधे झालेल्या भ्रष्टाचाराची होती.जो कुणी भ्रष्टाचार करीत त्या अधिकारी कर्मचारी यांना पाठीशी घालवू नये या मताशी सर्व सभागृह आहे यात दूमत नाही.आताच स.सदस्य श्री.देसरडा यांनी म्हटले की एका वर्षात ३० लक्ष मागे १० लक्षचा भ्रष्टाचार होतो तर गेल्या ३२ वर्षात या विभागातून किमान ५ कोटीचा भ्रष्टाचार झालेला असावा असे म्हटले आहे. यात पहिली व दुसरी कंपनी सोडली तर तिसरी कंपनी ही एका लोकप्रतिनिधी यांची आहे हे सांगण्यास स.सदस्य विसरलेले आहे. हे मला आवर्जून सांगावे लागते.त्यासाठी याची पून्हा चौकशी होणे आवश्यक आहे. त्या कंपनीने इन्कमटॅक्स भरलेला नाही. तसेच सेलटॅक्स भरलेला नाही. डॉ. देशपांडे प्रकरण म्हणजे हा फार मोठा भ्रष्टाचार आहे. पुन्हा वौकशी करण्यात यावी योग्य वाटेल त्या व्यक्तीची चोकशी साठी नियुक्ती करावी. किंवा नगर विकास खात्याकडे एखादा सक्षम अधिकारी असेल त्यांचे मार्फत चौकशी झाली पाहिजे या मताचा मी आहे. चौकशी ही कागदोपत्री नसावी त्यासाठीही ठरावीक वेळ देण्यात यावा. ज्यांनी ज्यांनी भ्रष्टाचार केला त्या कंपनीना ही जबाबदार धरले पाहिजे ही माझी मागणी आहे.माझ्या माहिती प्रमाणे अहवाल आज सभागृहात येतो परंतू डॉ. देशपांडे यांचेकडील येणारी रक्क्म फार दिवसापासून कपात प्रशासन करीत आहे. रक्क्म कपात करीत असेल व फक्त मान्यतेसाठी प्रस्ताव येत असेल तर हे धोरण प्रशासनाचे अत्यंत चुकीचे आहे. म्हणून वेगळी कमेटी स्थापन करावी दोन महिण्यामधे अहवाल मागवावा तो पर्यत हा अहवाल स्थगित ठेवावा अशी विनंती आहे.या प्रकरणामधे डॉ. देशपांडेच नसून अनेक यात गुंतलेले आहेत.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर :ज्या कंपनीकडून औषधी खरेदी केली त्यांनी इन्कमटॅक्स सेलटॅक्स भरलेला आहे कि नाही याची सुधदा चौकशी करावी. कोण लोकप्रतिनिधी यात सामिल होते माहिती मिळाली तर सभागृहासमोर ठेवावी.

मा.महापौर : डॉ.बिनवडे यांचे अभिनंदन. डॉ.देशपांडे,औषधी खरेदी भ्रष्टाचाराबाबत स.सदस्यांनी विचार मांडले. सर्व स.सभागृहाचे मत लक्षात घेवून या संदर्भात सविस्तर फेरचौकशी व्हावी, याबाबत प्रशासनास पुन्हा आदेशित करण्यात येते की,परत फेर चौकशी दोन किंवा तीन सदस्यीय असे सक्षम अधिकारी नियुक्त करून सविस्तर चौकशी करून येत्या ६ महिण्यात अहवाल या सभागृहासमोर ठेवावा. तोपर्यत या ठरावास स्थगिती देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्तावा संदर्भात सभागृहात झालेल्या चर्चेप्रमाणे, प्रशासनाने पुन्हा दोन किंवा तीन सदस्यीय असे सक्षम अधिकारी नियुक्त करून सविस्तर चौकशी करून येत्या ६ महिण्यात अहवाल सभागृहासमोर ठेवावा. तोपर्यंत सदर प्रस्ताव स्थगित ठेवण्यांस मान्यता देण्यात आली.

**स.सदस्यांचे प्रस्ताव**

**विषय क्र. ७१/१२ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, डॉ.रफिक झकेरीया यांचे नुकतेच काही दिवसापूर्वी दु:खद निधन झालेले आहे. त्यांनी या शहराच्या विकासासाठी मोठे कार्य केलेले असून त्यांनी कोणत्याही प्रकारचा भेदभाव न करता विकास कामे केली. तसेच या शहरासाठी शिक्षण क्षेत्रात भरीव कार्य त्यांनी केलेले असून ते एक विचारवंत तसेच तज्ञ व्यक्ती होते.

या शहरातील स्व.अण्णाभाऊ साठे चौक ते जळगांव टी पॉईट चौक हर्सूल या रस्त्याला डॉ.रफिक झकेरीया असे नांव देण्यात यावे. प्रस्ताव मान्यतेसाठी सादर.

सुचक : श्री.संजय उत्तमराव जगताप अनुमोदक : श्री.नासेर नाहदी चाऊस

मा.महापौर : प्रस्ताव मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शहरातील स्व.अण्णाभाऊ साठे चौक ते जळगांव टी पॉईट चौक हर्सूल या रस्त्याला डॉ.रफिक झकेरीया असे नांव देण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

या बरोबरच ‘‘ राष्ट्रगिताने ‘‘सभा संपल्याचे मा.महापौर यांनी घोषित केले.

नगर सचिव.
महानगरपालिका. औरंगाबाद.